रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २२४
www.ramprahar.com

शुक्रवार, १ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


ग्रामपंचायतींना वैद्यकीय साहित्याचे वितरण/२

बेपत्ता चार शाळकरी मुली सुखरूप घरी परतल्या/३

नफ्याचे आमिष दाखवून एक कोटी ४५ लाखांचा गंडा/६


## पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेला केंद्राची मंजुरी



**नवी दिल्ली** : केंद्रीय मंत्रिमंडळाच्या गुरुवारी (दि.२९) झालेल्या बैठकीत पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेला मंजुरी देण्यात आली. या योजनेंतर्गत एक कोटी घरांना ३०० युनिट मोफत वीज मिळणार असून वर्षाला १५ हजार रुपयांची बचत होणार आहे, असे केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ फेब्रुवारीला या योजनेची घोषणा केली होती. यामध्ये प्रत्येक कुटुंबासाठी दोन किलोवॅटपर्यंतच्या रुफ टॉप सोलर प्लांटची किंमत एक लाख ४५ रुपये असणार आहे. यामध्ये सरकार ७८ हजार रुपये सबसिडी देणार आहे. या संदर्भात एक राष्ट्रीय पोर्टल सुरू करण्यात आले असून घरमालक त्यावर विक्रेता निवडू शकतील. यासाठी बँकेकडून सुलभ हप्त्यांमध्ये कर्जही उपलब्ध होणार आहे. या वीज योजनेंतर्गत प्रत्येक गावात मॉडेल सोलर व्हिलेज बनवले जाणार आहे.

# शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही -पद्मश्री दादा इदाते

## स्व. जनार्दन भगत स्मृती जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

**पनवेल : हरेश साठे**

शिक्षणाचे तत्त्व फार मोठे असून शिक्षण हे जीवनातील सर्वांत मुख्य अंग आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. त्यामुळे शिक्षणाचा पहिला आग्रह महत्त्वाचा असतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष व निती आयोग उपसमिती सदस्य पद्मश्री भिकूजी उर्फ दादा इदाते यांनी गुरुवारी (दि.२९) केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान, गोरगरीब व कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांचा ९६वा जयंती सोहळा व स्व. जनार्दन भगत स्मृती जीवन गौरव पुरस्कार सोहळा खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या (स्वायत्त) मैदानावर भव्य, दिमाखात आणि समारंभपूर्वक पार पडला. संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यात स्व. जनार्दन भगत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने पद्मश्री दादा इदाते यांना संसद महारत्न पुरस्कारप्राप्त खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पाच लाख रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या सोहळ्यास विशेष अतिथी म्हणून रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, इंटकचे राष्ट्रीय सचिव महेंद्र घरत, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संचालक शकुंतला ठाकूर, परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, संजय भगत, हरिश्चंद्र पाटील, प्रकाश भगत, अजय भगत, अनिल भगत, संजय पाटील, अतुल पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, भाऊशेठ पाटील, वसंतशेठ पाटील, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्राचार्य एस.के. पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, हितचिंतक हजारोंच्या संख्येने हजर होते.

पद्मश्री दादा इदाते यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले की, जीवनात माणसे भेटतात तसे आपल्यात बदल होत असतो. कोणतेही काम करता करता आपला विचार व कृती विकसित होत असते. त्याच अनुषंगाने २४ तास देश, धर्म व संस्कृती यांचा आणि माणसातला माणूस शोधण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे. सामान्य माणूस व त्याचा विकास केंद्रबिंदू मानून त्यांनी काम केले आहे. या वेळी पद्मश्री दादा इदाते यांनी आपला जीवनप्रवास थोडक्यात कथन केला. (पान २ वर..)



### गुणीजनांचा सत्कार म्हणजेच समाजाचा सत्कार -लोकनेते रामशेठ ठाकूर



कर्मवीर अण्णांकडून सुरू झालेली सेवा या भागात रूजवण्याचे काम जनार्दन भगतसाहेबांनी केले. त्यांच्या मार्गाने जात असताना समाजातील प्रत्येकाला न्याय मिळेल ही शिकवणच मूलमंत्र आहे. चांगले काम करणाऱ्या व्यक्तीला गौरविणे हे आमच्या संस्थेचे काम आहे. समाजासाठी कष्ट घेणाऱ्या व्यक्तीचा जेव्हा सन्मान होतो ती प्रेरणा असते आणि हीच प्रेरणा भावी पिढीला आदर्श ठरते. त्यामुळे अशा गुणीजनांचा सत्कार म्हणजेच समाजाचा सत्कार असतो, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी म्हटले.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### माणसाला न्याय देण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची -खासदार श्रीरंग बारणे

माणसाला न्याय देण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, असे प्रतिपादन संसद महारत्न पुरस्कारप्राप्त मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी या वेळी केले. पद्मश्री दादा इदाते हे व्यक्तिमत्वही तळागाळातील लोकांसाठी झटणारे आहे. त्यामुळे स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात आलेल्या या पुरस्काराने गुणीजनांचा आणि पर्यायाने समाजाचा सन्मान झाला आहे, असेही खासदार बारणे यांनी नमूद केले.

### हितचिंतकांचे आशीर्वाद यापुढेही राहतील -आमदार प्रशांत ठाकूर

स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या नावाने उभारलेली संस्था लोकनेते रामशेठ ठाकूर व सहकाऱ्यांच्या माध्यमातून यशस्वी वाटचाल करीत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची संख्यात्मक नाही, तर दर्जात्मक आणि गुणात्मक वाढ करण्याचे काम होत आहे. संस्थेच्या या वाटचालीत हितचिंतकांचे आशीर्वाद यापुढेही राहतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजासाठी सर्वस्व अर्पण केले -डॉ. अनिल पाटील

जनार्दन भगतसाहेबांनी सर्व स्तरातील लोकांसाठी लढे दिले, त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्याचप्रमाणे त्यांचे जावई असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजासाठी सर्वस्व अर्पण केले आहे. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेला रामशेठ ठाकूर यांचा आधार असून ते 'रयत'ला लाभलेली देणगी आहे, अशा शब्दांत रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

### कर्मयोगी माणसाच्या आठवणीत दुसऱ्या कर्मयोगी व्यक्तीला पुरस्कार -माजी आमदार धैर्यशील पाटील

माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी, कर्मयोगी माणसाच्या आठवणीत दुसऱ्या कर्मयोगी व्यक्तीला हा पुरस्कार असल्याचे उद्गार काढले. ते पुढे म्हणाले की, जनार्दन भगतसाहेबांना बघण्याचा योग मला आला नाही, पण वडील त्यांचा आवर्जून उल्लेख करायचे. पनवेल, उरणमधील संघर्ष जेव्हा आठवणींच्या रूपाने समोर येतो तेव्हा लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव येते. त्यामध्ये अग्रणी सहकारी म्हणून भगतसाहेबांच्या नावाचा उल्लेख आवर्जून येतो.

### मोखाड्याच्या शाळेला आवर्जून भेट द्या -ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी म्हटले की, भगतसाहेबांचे जावई लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या सासऱ्यांच्या नावाने संस्था उभारून या संस्थेला यश मिळवून दिले असून सासऱ्यांच्या नावाने शिक्षण संस्था निर्माण करणारे हे एकमेव उदाहरण असेल. त्याचप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा येथे अतिशय दुर्गम भागात रयत शिक्षण संस्थचे दर्जेदार विद्यालय उभारले आहे. तेही सर्वांनी आवर्जून भेट देऊन पहावे, असे आवाहन भावे यांनी केले.

## आजपासून दहावीची परीक्षा



**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च या कालावधीत होणार आहे. या परीक्षेसाठी १६ लाख नऊ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठीच्या उपाययोजना राज्य मंडळाने केल्या असून २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहेत.

उत्तरपत्रिकेची गोपनीयता राहण्यासाठी सहाय्यक परीरक्षक बैठे पथक म्हणून परीक्षा केंद्रावर कार्यरत राहतील तसेच प्रश्नपत्रिकांची गोपनीय पाकिटे ताब्यात घेतल्यापासून वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण करण्यात येईल. सहाय्यक परीरक्षक यांनी त्यांच्या मोबाइलचे जीपीएस सुरू ठेवणे आवश्यक आहे. राज्य मंडळाच्या भरारी पथकासह जिल्हा स्तरावरही भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. परीक्षेच्या वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत. परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी राज्य मंडळ स्तरावर दहा समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## नमो चषक महोत्सवाचा उद्या पारितोषिक वितरण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात नमो चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव उत्साहात झाला.

### माजी क्रिकेटपटू तथा प्रशिक्षक दिलीप वेंगसरकर यांची प्रमुख उपस्थिती



या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि.२) दुपारी ३ वाजता पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी क्रिकेटपटू तथा प्रशिक्षक दिलीप वेंगसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, (पान २ वर..)




# सामान्य नागरिकांना वेळेवर दर्जेदार आरोग्यसेवा द्या -मुख्यमंत्री शिंदे

## १४४६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदस्थापनेचे ऑनलाईन आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

आरोग्य विभागाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी 'गट-अ' पदाची भरती प्रकिया पूर्ण करण्यात आली. विधानभवनात मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १४४६ एमबीबीएस डॉक्टरांना पदस्थापनेचे आदेश ऑनलाईन देण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत तसेच मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.



आरोग्य विभागाने युद्ध पातळीवर ही भरती प्रक्रिया यशस्वीपणे राबविली. मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची भरती झाली असून त्या माध्यमातून सामान्य नागरिकांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यात यावी, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी केले.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी 'गट-अ' या संवर्गातील १७२९ रिक्त पदांसाठी एमबीबीएस व बीएएमएस उमेदवारांचे एकूण २९ हजार ५५६ अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे प्राप्त झाले होते. ६५७५ एमबीबीएस आर्हताधारक उमेदवारांनी अर्ज केले होते. एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची छाननी करून अंतिम गुणवत्ता यादीनुसार १४४६ एमबीबीएस आर्हताधारक उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. त्यांना पदस्थापनेचे आदेश देण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील १७२९ रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्याबाबत शासनाने ३० जानेवारी २०२४ रोजी मान्यता दिली होती. पदभरती प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर छाननी प्रक्रिया पूर्ण करून आदेशही देण्यात आले. अत्यंत कमी दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण करून वैद्यकीय अधिकाऱ्यांना तत्काळ नियुक्तीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले.

विधानभवनात झालेल्या या कार्यक्रमाला आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायतींना वैद्यकीय साहित्याचे वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुणे, ठाणे व रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना वैद्यकीय साहित्याचे वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील सावरोली येथील ३० विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासाच्या ऑनलाईन प्रशिक्षणाचा प्रारंभ करण्यात आला.



साहित्य वितरण व उद्घाटन समारंभास शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, आमदार भरत गोगावले उपस्थित होते. प्रत्येक उत्सव मंडळाच्या माध्यमातून किमान ५०० ते ६०० कुटुंबांना तसेच दहा ते बारा चाळी, सोसायट्या यामधील नागरिकांपर्यंत वैद्यकीय साहित्य पोहचविण्यात येणार आहे. यासाठी मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यातील नोंदणीकृत सार्वजनिक उत्सव मंडळे, को-ऑप सोसायटी यांना एकूण २९१ संच तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड एकूण ७९ संच, रायगड जिल्ह्यातील खालापूर व बिरवाडी, महाड येथे १२ वैद्यकीय साहित्य संच देण्यात आले.

दहावीनंतर विद्यार्थ्यांसाठी एचटीएमएल व कोडिंगचे बेसिक प्रशिक्षण मिळाल्यास पुढील भविष्यासाठी उपयोगी ठरू शकेल. यासाठी रायगडमधील सावरोली, उंबरे (ता.खालापूर), बिरवाडी (ता. महाड) येथील ३० विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या साहित्य वितरण कार्यक्रमाचे संयोजन मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे प्रमुख तथा राज्य समन्वयक डॉ. अमोल शिंदे, समन्वयक मनोज घोडे-पाटील, सतिश जाधव आदींनी केले.

या सर्व कामात सहकार्य करणाऱ्या वाशिमच्या अस्मिता मल्टीपर्पज एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष मनोज भगत, वैशाली भगत, स्वराज्य सेवा वाघमोडे प्रतिष्ठानच्या डॉ. राजकुमार वाघमोडे, अक्षय पाटील यांच्यासह सावरोलीचे सरपंच संतोष बैलमारे, खोपोलीच्या वाय.ए.के. पब्लिक स्कूलच्या उपप्राचार्य पूनम गुप्ता, सहकार देवगिरी फाउंडेशनचे अनंत अंतरकर, डॉ. राजेंद्र जोशी हजर होते.

# शिवसेना कार्यालयातून जनहिताची कामे करावी -आमदार महेंद्र थोरवे



**चौक : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेना कार्यालयातून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे काम करावे. जनतेच्या समस्या सुटतील याकडे जातीने लक्ष द्यावे, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

खालापूर तालुक्याच्या ठिकाणी शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी आमदार महेंद्र थोरवे बोलत होते. ते पुढे म्हणाले, प्रत्येक वरिष्ठ पदाधिकाऱ्याने आठवड्यातून एकदा येथे यावे, मीही आठवड्यातून एकदा या ठिकाणी जनतेला भेटणार आहे, असे सांगितले. येथे शिवसेना संपर्क कार्यालय झाल्याने सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले असून कार्यकर्त्यांमध्ये एक ऊर्जा निर्माण झाल्याचे शिवसैनिकांनी सांगितले.

कार्यक्रमास ज्येष्ठ सल्लागार व माजी सरपंच गोविंद बैलमारे, संपर्क प्रमूख विजय पाटील, तालुका प्रमुख संदेश पाटील, युवा तालुका प्रमुख रोहित विचारे, ज्येष्ठ नेते निवृत्ती पिंगळे, संजय देशमुख, माजी उपसभापती जनार्दन थोरवे, नगराध्यक्ष सौ. मोडवे, नीलम चोरगे, संतोष विचारे, संतोष मुंढे, तात्या तिथे, नगरसेवक अमोल जाधव, शशी देशमुख, अंकुश मोरे, राजू गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्व. जनार्दन भगत यांना अभिवादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि.२९) स्व. जनार्दन भगतसाहेब यांची ९६वी जयंती साजरी करण्यात आली.

या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले, तसेच महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये उपस्थित राहून स्व. जनार्दन भगतसाहेब यांना आदरांजली अर्पण केली.

या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन नितीन वासकर मुख्य लिपिक यांनी केले.



# सिडको महागृहनिर्माण योजनेसाठी अर्जदारांना अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य

**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४मधील सदनिकांकरिता अर्ज करणाऱ्या अर्जदारांकरिता महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असल्याचे सिडकोतर्फे सांगण्यात आले आहे. सिडकोच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या योजनेच्या माहितीपुस्तिकेत अनावधानाने अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही, असे टंकलिखित झाले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे २६ जानेवारी २०२४ रोजी महागृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली. या योजनेंतर्गत एकूण ३,३२२ सदनिका प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण गटातील नागरिकांकरिता द्रोणागिरी आणि तळोजा नोडमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या सर्व योजनांमध्ये महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची अट ठेवण्यात आली आहे, परंतु सिडकोच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या योजनेच्या माहितीपुस्तिकेत अनावधानाने अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही, असे टंकलिखित झाले असल्याने अर्जदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे सिडकोने महागृहनिर्माण योजनेकरीता सर्व अर्जदारांना अधिवास प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असणार आहे, असे स्पष्ट केले आहे.

पान १ वरुन

## शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही -पद्मश्री दादा इदाते

महापुरुषांचे वचन जीवनाला प्रेरणा देतात. त्यामुळे प्रत्येकाने महापुरुषाच्या विचारांच्या वचनाचा आदर्श अंगीकारला पाहिजे. जीवनात अनेक संकट येत जात असतात. त्यातून मीही गेलो आहे. घरी अठरा विश्व दारिद्र्य असल्यामुळे जिद्द होती, पण शिकणार कसे ही चिंता होती. जीवनात बदल घडविण्याचे काम आपल्या हाती असते हा विचार रूजवत भागवत सरांनी तू शिकलाच पाहिजे असा आग्रह केला. त्यांचा आग्रह मला जिद्द देऊन गेला. त्यामुळे मी पुढे वाटचाल करीत राहिलो. मी शाळेत आणि आई-वडील मुंबईला फुटपाथवर राहिले. मी ज्या तालुक्यात जन्मलो त्या ठिकाणी आमच्या सात वस्त्यांना भिकारवाडा असे नकाशावर नाव होते. मी ते श्रीमंतवाडा करायची मनाशी खूणगाठ बांधली. शिक्षण, सामाजिक क्षेत्रात काम केले. प्रवास कष्टाने झाला, परंतु त्यात यशस्वी झालो. पद्मश्री आणि इतर अनेक पुरस्कार मिळाले. देशव्यापी प्रवास केला. या सर्व जीवनप्रवासात आपले जीवन घडविण्याचे काम आपल्या हाती असते ही शिकवण मला मुळातच मंत्र देऊन गेली, अशा मोजक्या शब्दांत पद्मश्री दादा इदाते यांनी आपला प्रवास अधोरेखित केला.

खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्व. जनार्दन भगतसाहेबांनी केलेल्या कार्यामुळे या परिसराला वैभव प्राप्त झाले आहे. त्या काळी सरपंच, पंचायत समिती अशी पदे भूषवित असताना त्यांनी त्याचा कधीही बडेजाव केला नाही. उलट प्रत्येक जण आपला आहे असे मानून त्यांना मदत करण्याचे काम त्यांनी केले. त्याच धर्तीवर लोकनेते रामशेठ ठाकूर सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून काम करीत असतात. सामाजिक जीवनात काम करीत असताना माणूस महत्त्वाचा असतो. त्यामुळे माणसासाठी माणूस जोडणारे व्यक्तिमत्व म्हणजेच लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांचा परिवार आहे, असे गौरवोद्गार खासदार बारणे यांनी काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, मागील वेळी राज्यातील कणखर नेते, थोर विचारवंत प्रा.डॉ. एन.डी. पाटीलसाहेबांना स्व. जनार्दन भगत स्मृती जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे रानावनात राहणाऱ्या लोकांसाठी प्रचंड काम करणाऱ्या पद्मश्री दादा इदाते यांना आज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ही आमच्यासाठी एक प्रेरणा आहे. पुढे बोलताना त्यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीत हजारो हितचिंतक जोडले गेले आहेत आणि त्यामुळेच ही संस्था यशस्वी घोडदौड करू शकली, असे सांगून सर्वांप्रती आभार व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांनी म्हटले की, स्व. जनार्दन भगतसाहेबांची स्मृती मोठी आहे. त्यांचे कार्य सर्व समाजाला न्याय देणारे ठरले आहे. रयत शिक्षण संस्था मोठी संस्था आहे. त्याचप्रमाणे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था सर्व परीने मोठ्या प्रमाणात विकसित आहे. त्यामुळे मार्गदर्शन घेण्यासाठी आम्ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सातत्याने येत असतो. चार वर्षांपूर्वी या पुरस्काराला सुरुवात झाली. पहिला पुरस्कार थोर विचारवंत एन.डी. पाटील सरांना प्रदान करण्यात आला. आज पुढील पुरस्कार तळागाळात प्रचंड काम करणाऱ्या दादा इदातेंना प्रदान झाला याचा अत्यानंद आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, भगतसाहेबांचे कार्य आपले दीपस्तंभ मानून समाजातील मंडळींनी काम केले आहे. पद्मश्री दादा इदाते यांनीही समाजातील तळागाळात शिक्षण पोहचवण्याचे काम केले आहे. संपूर्ण देशात निती आयोगाच्या माध्यमातून काम करून समाजाला प्रकाशझोतात आणण्याचे काम त्यांनी केले असून अनेक संस्था त्यांची प्रेरणा घेऊन काम करीत आहेत. त्यांना हा पुरस्कार सहावेळा महासंसदरत्न असलेले खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते प्रदान करताना खूप आनंद होत आहे.

भगतसाहेबांनी प्रत्येक माणसाला न्याय देण्याचे काम केले. पद्मश्री दादा इदाते यांनी केलेले काम देशपातळीवरचे असून त्यांच्या कार्यामुळे सर्वसामान्य माणसाला बळ मिळाले. भगतसाहेब आणि दादा इदाते ही समाजासाठी काम करणारी व्यक्तिमत्वं आहेत. त्यामुळे पहिल्या पिढीचे कष्ट पुढील पिढीला मार्गदर्शक आहेत, असेही पाटील यांनी म्हटले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनीही आपल्या भाषणातून भगतसाहेबांच्या कार्याला उजाळा देत आजचा हा सोहळा समाजाची पूजा करणाऱ्यांचा सन्मान आहे, असे सांगितले. लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमी मला अशा कार्यक्रमाला आमंत्रित करीत असतात हे माझे भाग्य असून माझा नेहमी सन्मान करतात त्याबद्दल मी आपला आभारी आहे, असेही ते म्हणाले.

सोहळ्याचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपकार्याध्यक्ष वाय.टी. देशमुख यांनी मानले. या वेळी रायगड जिल्ह्यातील पहिली कमर्शियल पायलट प्राप्ती ठाकूर तसेच संस्थेतील इतर गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

## नमो चषक महोत्सवाचा उद्या पारितोषिक वितरण सोहळा

भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील उदयोन्मुख कलाकारांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन व व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र विधानसभानिहाय नमो चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पनवेल विधानसभा मतदारसंघात रंगलेल्या नमो चषक २०२४ स्पर्धत एक लाख १३ हजार २७८ स्पर्धकांनी सहभाग घेऊन महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकाविला आहे. या महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांना या पारितोषिक वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या सोहळ्यास क्रीडापटू व क्रीडारसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माजी सभागृह नेते परेश ठाकूर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, दिनेश खानावकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, खारघर अध्यख नितेश पाटील, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक यांनी केले आहे.

# अलिबागमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्थानीय लोकाधिकार समिती, आरसीएफ थळतर्फे मंगळवारी (दि. २७) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध कवी-गीतकार वैभव जोशी यांनी साहित्यिक म्हणून जीवन प्रवास उलगडताना त्यांच्या लोकप्रिय काव्यरचना सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.



स्सकाळच्या सत्रात आरसीएफ कारखान्यात मराठी भाषेसंदर्भात निबंध स्पर्धा व शिवव्याख्याते अनिकेत पाटील यांचे शिवचरित्र कथन व गड किल्ले यावर व्याख्यान झाले. संध्याकाळी सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक तसेच लोकप्रिय कवी व गीतकार वैभव जोशी यांच्या साहित्यिक अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांनी वैभव जोशी यांची मुलाखत घेऊन त्यांना त्यांच्या साहित्य प्रवासाविषयी बोलते केले.

या कार्यक्रमास विशेष उपस्थित अभिनेत्री भारती आचरेकर यांनी लोकाग्रहस्तव घननीळा लडिवाळा गीत सादर केले. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र शासन गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त अभय घरत यांसह निबंध स्पर्धा विजेत्यांचा सन्मान पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे कार्याध्यक्ष संजय धारिया यांनी केले, सूत्रसंचालन अजित कामतेकर यांनी तर आभार वैभव राऊत यांनी मानले.

# खारघरच्या उत्सव चौक परिसरात माथेफिरूचा हैदोस

**खारघर : रामप्रहर वृत्त**


तळोजे फेज २ येथील एक तरुण हातात चॉपर घेऊन नागरिकांच्या अंगावर जाऊन जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न करीत असताना नागरिकांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. तो त्यांना शस्त्राचा धाक, अर्वाच्च शिव्या व सामाजिक सलोखा बिघडेल, अशी भाषा वापरत होता. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप करून त्याला अटक केली. काही तासांत त्याला सोडूनही देण्यात आले. त्यानंतर रात्री त्याच परिसरात पुनरावृत्ती करून गोंधळ घालण्याचा त्याने प्रयत्न केला. याबाबत पनवेल महापालिकेचे माजी सभापती व नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी खारघर पोलीस स्टेशनमध्ये या तरुणावर त्वरीत कारवाई करण्यातबाबत निवेदन दिले.

खारघर शहर भाजप सरचिटणीस दीपक शिंदे म्हणाले की, अशा घटनांमुळे जीवितहानी होण्याची शक्यता आहे. खारघर शहर उपाध्यक्ष संजय घरत यांनी, महामार्गावरील तृतीयपंथी रात्रीच्या वेळी अनुचित प्रकार करीत असल्याचे माहिती दिली. या विषयी योग्य कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले.



**दुखवटा**

## विजयकुमार शेठ



**माणगाव** : येथील होलसेल व्यापारी कमलेश शेठ यांचे पिताश्री विजयकुमार महादेव शेठ यांचे बुधवारी (दि.२८)पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. कै. विजयकुमार शेठ यांचा दशक्रिया विधी ८ मार्च रोजी जुने माणगाव संगमेश्वर मंदिर येथे होणार असून उत्तरकार्य विधी ११ मार्च रोजी राहते घरी कचेरी रोड माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र कमलेश शेठ यांनी सांगितले.

# आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे शिक्षकांचा जिवाभावाचा नेता -आमदार प्रशांत ठाकूर

## शाळांना ई-लर्निंग साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना जी संधी मिळाली त्याचे सोने त्यांनी केले. शिक्षकांमध्ये राहून शिक्षकांचा जिवाभावाचा नेता ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या रुपाने मिळाला, असे गौरवोद्गार भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी डिजिटल ई-लर्निंग साहित्याच्या वाटपावेळी केले, तर आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शिक्षकांचे सर्व प्रश्न सोडवू, असा विश्वास व्यक्त केला.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०२३-२४ अंतर्गत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम गुरुवारी (दि.२९) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयात झाला. या वेळी पनवेल, उरण, कर्जत आणि खालापूर तालुक्यातील ६० शाळांना हे साहित्यांचे वाटप करण्यात आले. यामध्ये प्रोजेक्टर, स्क्रीन, माऊस, पेनड्राईव्ह आणि स्टॅण्ड या साहित्याचा समावेश आहे.

या कार्यक्रमावेळी जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, विनोद डाकी, रवींद्र पाटील, अरुण पाटोळे, विधी पाटील यांच्यासह शिक्षक आणि मान्यवर उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, शैक्षणिक साहित्याचा सुयोग्य वापर करून आपली शाळा यशस्वी करण्यासाठी आपले योगदान द्याल अशी अपेक्षा व्यक्त करून आपल्या मदतीसाठी सदैव तत्पर असेन, अशी ग्वाही दिली.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे व्याख्यान व निबंध स्पर्धा

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; विजेत्यांना बक्षिसे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्त्व बालवयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी बुधवारी (दि.२८) चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये महापालिकेच्या वतीने पाणी या विषयावर व्याख्यान व पृथ्वीवरील माती या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

पर्यावरण सेवा योजनेंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनुसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजुषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

या वेळी विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले, तसेच पर्यावरण वाचविण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. या वेळी सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, उच्च माध्यमिक विभाग प्राचार्य प्रशांत मोरे, उच्च माध्यमिक विभाग मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी प्राथमिक विभाग मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिक विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, पर्यावरण सेवा योजना समन्वयक हरिश्चंद्र ठाकूर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ■ निबंध स्पर्धेतील विजेते

**इ. सहावी गट :** अनन्या अजय पयेर प्रथम, गार्गी महेश म्हात्रे द्वितीय, दिव्या देविदास मुळीक तृतीय

**इ. सातवी गट :** वेदांत नितीन शिंदे प्रथम, नंदिनी उमेश साळुंखे द्वितीय, वरद नवनाथ गावडे तृतीय

**इ. आठवी गट :** भक्ती संतोष पाटील प्रथम, माधवी दगडू काबुगडे द्वितीय, अर्पिता प्रदीप टेमघिरे तृतीय

# शारोन इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

शारोन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी शालेय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या कार्यक्रमात देशभक्ती, कौटुंबिक मूल्ये, विविधतेतील एकता, प्रेम, सामाजिक संदेश आणि पालकत्व यासारख्या विविध विषयांवरती कला प्रदर्शन करण्यात आले त्याचबरोबर जिम्नॅस्टिक्सची प्रात्यक्षिकही सादर करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी जिम्नॅस्टिक्समध्ये दाखवलेले कौशल्य पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले आणि उपस्थितांनी टाळ्या वाजवून विद्यार्थ्यांचे प्रचंड कौतुक केले. प्रमुख पाहुण्या शिक्षणाधिकारी प्राथमिक रायगड पुनीता गुरव, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सिताराम मोहिते, ॲड. प्रदीप इंगोले, नेरे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश घाडगे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेतील सर्व विभागातील प्रत्येक विद्यार्थ्याने या सोहळ्यात सहभाग घेऊन कलागुणांचे प्रदर्शन केले. नृत्य, गाणी, सामाजिक संदेश देणारी नाटके आणि अशा नाटकांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सक्षम शिक्षकांनी दाखवलेल्या कामगिरीमुळे शाळेचे वातावरण आणि स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यांच्या सौंदर्यात आणखीनच भर पडली.






**पनवेल : थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीनिमित्त मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिवादन केले. सोबत मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे उपशिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, सागर रंधवे, माणिक घरत, राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.**

# खारघरमधील धोकादायक मॅनहोलच्या दुरूस्तीची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ३५ येथील पांडवमार्ग सर्कलमधील मॅनहोललगत मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यात दुचाकी अडकून अथवा एखादा पादचारी पडून अपघात होऊ शकतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने मॅनहोलची तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

खारघर, सेक्टर ३५ कडून तळोजाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची नेहमी वर्दळ असते. या रस्त्यावरील पांडव मार्ग चौकातून पेठगाव, तळोजा आणि खारघर वसाहतीकडे जाणाऱ्या मार्गावर शीघ्र कृतीदलाकडे जाताना मॅनहोललगत मोठा खड्डा पडला आहे. त्याची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याची मागणी होत आहे.



**पनवेल : कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांची जयंती गव्हाण ग्रामपंचायतीमध्ये साजरी करण्यात आली. या वेळी उपसरपंच विजय घरत, सदस्य सचिन घरत, कामिनी कोळी, योगिता भगत, उषा देशमुख, ग्रामसेवक एम. डी. पाटील, शिक्षक पी. ए. कोळी यांनी अभिवादन केले.**



**उलवे नोड : थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांची जयंती रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये साजरी झाली. या वेळी दर्शन ठाकूर यांनी अभिवादन केले. सोबत शिक्षकवृंद.**



**गव्हाण : छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात कै. जनार्दन भगत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुराव पाटोळे व शिक्षक उपस्थित होते.**

# बेपत्ता चार शाळकरी मुली सुखरूप परतल्या घरी

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील मुर्बी गावातील राजिप शाळेमध्ये इ.आठवीत शिक्षण घेणाऱ्या चार मुली बेपत्ता झाल्याने या मुलींचे पालक धास्तावले होते, मात्र दिवसभर शोध घेतल्यानंतर मंगळवारी (दि.२७) रात्री १२ वाजताच्या सुमारास चारही मुली सुखरुप खारघर रेल्वेस्थानकावर आढळल्याने पोलीस, शिक्षक आणि पालकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

मुर्बी गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेत आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या चार मुली मंगळवारी सकाळच्या सुमारास दप्तर वर्गात सोडून शाळेबाहेर पडल्या होत्या. दुपार झाल्यानंतरही मुली वर्गात निदर्शनास येत नसल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी परिसरात शोध घेतला, मात्र या मुली आढळल्या नाहीत. त्यामुळे शाळा प्रशासनाकडून याची माहिती मुलींच्या पालकांना आणि पोलिसांना देण्यात आली.

याबाबत पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करून पालक आणि शिक्षकांच्या मदतीने शोध सुरू केला. अखेर या चारही मुली रात्री १२ वाजताच्या सुमारास खारघर रेल्वेस्थानकावर आढळल्या. त्यानंतर पोलिसांनी मुलींची समजूत काढून त्यांना पालकांच्या स्वाधीन केले.



## संपादकीय

# बोलाचाच भात

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तारखा येत्या काही दिवसांतच जाहीर होतील अशी शक्यता आहे. तसे संकेत आता मिळू लागले आहेत. सर्वच पक्षांच्या राजकीय हालचाली वेग घेऊ लागल्या आहेत. सध्याच्या परिस्थितीत तरी भारतीय जनता पक्षाचे भारतीय जनतेमधील स्थान अढळ दिसते आहे हे खरे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या सभागृहात छातीठोकपणे 'अब की बार चारसौ पार' ही घोषणा दिली आहे. ती देशभरात दाही दिशांना दुमदुमली. मोठ मोठे राजकीय पंडितदेखील भाजपप्रणित 'एनडीए'ला यंदा हे लक्ष्य नक्की गाठता येईल असे अंदाज व्यक्त करू लागले आहेत. नुकत्याच झालेल्या मॅट्रीझ या संस्थेने केलेल्या पाहणीमध्ये भाजपप्रणित आघाडीला किमान ३६६ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. साहजिकच भाजपच्या कार्यकर्त्यांचा उत्साह सध्या गगनाला भिडलेला आहे. याचा दुसरा परिणाम विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीवर झालेला दिसतो. मोदी सरकारने सुरू ठेवलेल्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेच्या झळा लागू लागल्यामुळे घाबरून एकत्र आलेली मंडळी म्हणजेच इंडिया आघाडी. त्यांना फक्त आपापल्या परिवारांचे तपास यंत्रणांपासून संरक्षण करायचे आहे. ईडी आणि सीबीआयसारख्या तपास यंत्रणांच्या कारवाईमुळे एकत्र आलेले हे नेते पंतप्रधान मोदी यांच्या झंझावातापुढे टिकणे तसे अशक्यच आहे. तरीही काही प्रमाणात जागावाटप यशस्वीरित्या करून इंडिया आघाडीने सध्या उसने अवसान आणले आहे हे मान्य करावे लागेल. राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडीचे जे काही होत आहे, तशीच स्थिती महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीची झालेली दिसते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेतील उरलेसुरले यांची जी आघाडी आहे, त्यांना प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित आघाडीची साथ आहे की नाही हेदेखील अद्याप पुरेसे स्पष्ट नाही. महाविकास आघाडीच्या बुधवारी झालेल्या बैठकीमध्ये वंचित आघाडीचे प्रतिनिधी सहभागी झाले हे खरे, परंतु त्यांनी 'मविआ'समोर ठेवलेल्या प्रस्ताववजा अटी कुठल्याही राजकीय पंडिताला बुचकळ्यात टाकणाऱ्या आहेत. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना 'मविआ'तर्फे उमेदवारी द्यावी हा वंचित आघाडीच्या अनेक प्रस्तावांपैकी एक प्रस्ताव आहे. अर्थात, निवडणुकीत रस नसल्याचे जरांगे यांनी परस्पर स्पष्ट केल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांची थोडीफार सुटका झाली असेच म्हणायला हवे. मुळात या आघाडीकडे कार्यकर्त्यांची फळीच उरलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. काँग्रेसकडे कार्यकर्त्यांची वानवा पहिल्यापासूनच होती. त्यातच त्यांचे दिग्गज नेते पक्ष सोडून भाजपच्या गोटात डेरेदाखल होऊ लागले आहेत. ज्येष्ठ नेतेच साथ सोडू लागले तर निवडणुका लढवायच्या तरी कशा हा त्यांच्या समोरील मोठा प्रश्न आहे. दुसरीकडे काँग्रेसमधील पक्षांतर्गत कुरबुरींनी कळस गाठला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यशैलीमुळे नाराज झालेल्या काही नेत्यांनी राजधानी दिल्लीत जाऊन काँग्रेस हायकमांडपुढे गाऱ्हाणे मांडल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बरेचसे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत सत्तेत सहभागी झाले आहेत. ठाकरे गटाच्या अवस्थेबद्दल तर काही बोलण्यासारखे उरलेलेच नाही. तरीही महाराष्ट्रातील ४८पैकी सर्वाधिक जागा ठाकरे गटच लढवेल असा दावा त्यांचेच प्रवक्ते रोजच्या रोज करीत आहेत. नेमक्या कशाच्या जोरावर ठाकरे गटाला वीसहून अधिक जागा लढवण्याची खुमखुमी आहे हे कळत नाही. सध्या तरी महाविकास आघाडीची अवस्था बोलाचाच भात, बोलाचीच कढी आणि बोलाचीच आघाडी अशी झालेली दिसते.**

# टेनिस क्रिकेटमध्ये समन्वय ठेवणारी यंत्रणा हवी

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्हा म्हणजे भाताचे कोठार, चळवळीच्या कार्यकर्त्यांचा जिल्हा अशी ओळख होती. आता हा जिल्हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. याच रायगड जिल्ह्याची क्रीडा क्षेत्रात कबड्डीचे माहेरघर अशी ओळख आहे. या जिल्ह्याने अनेक कबड्डीपटू, कबड्डीचे कार्यकर्ते दिले आहेत. याच जिल्ह्यात हुतूतूचे कबड्डी झाले. या जिल्ह्यात प्रत्येक गावात कबड्डीचा एक संघ आहे. दर शनिवार-रविवारी कबड्डीची स्पर्धा आयोजित केली जाते. मोठ मोठी पारितोषिके दिली जातात, परंतु आता परिस्थिती हळुहळू बदलू लागली आहे. कबड्डीऐवजी टेनिस क्रिकेट स्पर्धांची संख्या वाढू लागली आहे.

पूर्वी उरण, पनवेल या तालुक्यांमध्ये टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धा जास्त होत असत. आता प्रत्येक तालुक्यात या स्पर्धा होत आहेत. या स्पर्धा घेण्यास विरोध असण्याचे कारण नाही. टेनिस क्रिकेट खेळणाऱ्या गावखेड्यातील खेळाडूंना यातून पैसे मिळत आहेत. प्रत्येक मोसमात या स्पर्धांमधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. स्पर्धांचे आयोजन भव्य दिव्य असते, पण या स्पर्धांच्या आयोजनावर कुणाचे नियंत्रण नसते. भविष्यातील एकूण घडामोडी पहाता टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे यांच्यावर नियंत्रण व समन्वय ठेवणारी यंत्रणा असली पाहिजे. ती काळाची गरज आहे.

यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे वर्ष आहे. लोकसभा निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. लोकसभेपाठोपाठ विधानसभा निवडणूक होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही या वर्षी होणे अपेक्षित आहे. यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यामळे तरुण मतदारांना आपल्याकडे वळविण्यासाठी राजकीय पुढारी विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करणार हे उघड आहे. त्याची सुरुवात झाली आहे. रायगड जिल्ह्यात गावोगावी टेनिबॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून भव्य चषक आणि लाखो रुपयांची बक्षिसे दिली जात आहेत, तर कार, मोटरसायकल अशी वैयक्तिक बक्षीसे दिली जात आहेत.

पूर्वी दिवसा स्पर्धा होत असत. आता रात्री विद्युत प्रकाशझोतात क्रिकेट स्पर्धा खेळविण्याचे प्रमाण वाढले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे या स्पर्धांचे वैशिष्ट्य ठरत आहे. आयपीएलच्या धर्तीवर निरनिराळ्या संघांची निवड करून भव्य क्रिकेट लीगचेही आयोजन केले जात आहे. भले मोठे क्रिडांगण, प्रेक्षक गॅलरी, स्पर्धेचे लाईव्ह प्रक्षेपण, पंचांना रिव्ह्यू घेण्याची सुविधा अशा सुविधा जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथमच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रात्रंदिवस चालणाऱ्या या स्पर्धांना खेळाडू आणि प्रेक्षकांचाही उंदड प्रतिसाद मिळताना दिसतो आहे.

पूर्वी अलिबागमध्ये क्रीडाभुवनतर्फे २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जायची. ही स्पर्धा मानाची मानली जायची. खेळाडू या स्पर्धेची वाट पहायचे. टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धेचे प्रमाण अलिकडे भरपूर वाढलंय. अलिबागमध्येच प्रशांत नाईक मित्र मंडळाने क्रीडा भुवन मैदानावर तीन दिवस नाईट क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन केले होते. यानंतर माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांच्या कुटुंबाच्या वतीनेही माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर (पप्पा) चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शेतकरी कामगार पक्ष आणि पुरोगामी युवक संघटनेच्या पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनीही साई क्रीडा मंडळाच्या वतीने २९ फेब्रुवारीपासून झिराड येथे अलिबाग प्रीमिअर लीग स्पर्धेचे आयोजन केले आहे; तर मार्च महिन्याच्या सुरुवातीला शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांची आमदार चषक क्रिकेट स्पर्धा ४ ते ७ मार्च या कालावधीत होणार आहे. या केवळ अलिबाग तालुक्यातील क्रिकेट स्पर्धा आहेत. अन्य तालुक्यांमध्येदेखील अशा स्पर्धा होत असतात. नाईट क्रिकेट स्पर्धा होताच, त्याचबबरोबर दिवसा खेळवल्या जाणाऱ्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांची संख्या जास्त आहे.

या स्पर्धांच्या आयोजनामुळे स्थानिक खेळाडूंना आपली चुणूक दाखवण्याची संधी तर मिळतेच आहे. त्याचबरोबर ज्या संघातून खेळाडू खेळत आहेत त्या संघ व्यवस्थापनाकडून त्यांना चांगला मोबदलाही दिला जातो आहे. त्यामुळे खेळाडूही चांगलेच खूश असतात. हे जरी खरे असल तरी या स्पर्धांमध्ये विस्कळीतपणा असतो. कुणाचे नियंत्रण नसत. स्पर्धा आयोजनासाठी कुणाची परवानगी घ्यावी लागत नाही. आयोजक ठरवतील ते प्रवेश शुल्क. प्रत्येक स्पर्धेचे नियम वेगळे असतात. भविष्याचा विचार करता टेनिस क्रिकेटवर नियंत्रण ठेवणारी एक सक्षम यंत्रणा असायला हवी, जेणेकरून अशा स्पर्धांमध्ये समन्वय राखला जाऊन रसिकांनाही अधिक आनंद घेता येईल.

# थोर समाजसुधारक डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी



थोर समाजसुधारक, रायगडचे सुपुत्र, महाराष्ट्र भूषण नारायण विष्णू धर्माधिकारी ऊर्फ डॉ.नानासाहेब धर्माधिकारी दासबोधाचे निरूपणकार होते. त्यांची आज जयंती. त्यांनी आयुष्यभर समाजप्रबोधन, व्यसनमुक्ती आदी विविध क्षेत्रांत निरपेक्ष कार्य केले.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचा जन्म १ मार्च १९२२ रोजी झाला. शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाले. रेवदंड्याच्या शाळेत ते शिकत होते. धर्माधिकाऱ्यांच्या घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे. त्यांच्या घराण्याचे मूळचे आडनाव शांडिल्य असे होते. त्यांच्या भूतकाळात आठव्या पिढीतील पूर्वज गोविंद चिंतामण शांडिल्य ऊर्फ शांडिल्य हे धर्मजागृतीचे काम स्वेच्छेने करायचे. त्याकाळचे दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी त्यांना सन्मानाने 'धर्माधिकारी' अशी पदवी दिली. तेव्हापासून आजतागायत त्यांचे घराणे धर्माधिकारी हे आडनाव लावत आले आणि त्याला समर्पक असे धर्मजागृतीचे काम करताहेत.

डॉ.नानासाहेबांनी आपल्या पित्याकडून प्रेरणा घेऊन समाजाचे प्रबोधन करण्याचे सेवाव्रत घेतले आणि ते अव्याहतपणे चालवले. त्यांचे चिरंजीव दत्तात्रेय तथा पद्मश्री, महाराष्ट्र भूषण आप्पासाहेब धर्माधिकारी व नातू रायगड भूषण सचिनदादा धर्माधिकारी यांनीही नानासाहेबांच्या कार्याला वाहून घेतले आहे.

धर्माचरणाविषयी बोलताना त्या अनुषंगाने समाजाला सन्मार्गाला लावण्याची शिकवण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी देत गेले. आधुनिक संदर्भात दासबोधाच्या कमालीच्या सोप्या निरूपणातून विकारी मनांची मशागत करताना निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या असा सर्वांगीण पुरुषार्थाची ओळख त्यांनी स्वतःची ओळख विसरलेल्या समाजाला करून दिली. या कामासाठी त्यांनी १९४३ साली रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे श्री समर्थ आध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती स्थापन केली. या माध्यमातून ८ ऑक्टोबर १९४३ (विजयादशमी) रोजी मुंबई येथील गोरेगाव येथे प्रथम श्री बैठक सुरू करण्यात आली. या संस्थेद्वारे त्यांनी जगभरात अध्यात्माचा प्रसार केला. त्याच्या शाखा आज भारताबाहेरील अनेक देशांपर्यंत पसरल्या आहेत. त्या संस्थेमध्ये आजघडीला मराठी बरोबरच हिंदी, उडिया, तामिळ, बंगाली, कन्नड व इंग्रजीतून निरूपण केले जाते. सुरुवातीला महिला व पुरुषांचीच बैठक होत असे, परंतु बालवयापासूनच संस्कार व्हावेत म्हणून बालोपासना सुरू करण्यात आली. अध्यात्माचे धडे देतानाच नानांनी शेकडो खेडी, आदिवासी पाड्यांची भ्रमंती करून लोकांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले होते. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अज्ञान, स्त्रियांवरील अत्याचार, जातिभेद अशा कुप्रवृत्तींवर जोरदार प्रहार करत नानांनी सद्गुणांची पेरणी केली. त्यामुळे लाखो लोक व्यसनमुक्त होऊन परमार्थाकडे वळले. डॉ. नानासाहेबांना विविध पुरस्कार, सन्मानांनी गौरविण्यात आले. अशा या महात्म्याचे ८ जुलै २००८ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृती चिरंतन आहेत. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

### जबरदस्त! माहिती खरी की खोटी व्हॉट्सॲप सांगणार



व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांसाठी नव नवीन अपडेट देत असते. सध्या व्हॉट्सअपवर अनेक अफवा पसरवल्या जात आहेत. कोणतीही चुकीची माहिती पसरवून समाजात तेढ वाढवला जातो. यावर आता मेटा कंपनीने पर्याय आणला असून व्हॉट्सॲपवर आता एक नवीन फिचर अपडेट होणार आहे. यावर तुम्हाला आलेली माहिती खरी की खोटी हे दिसणार आहे.

सध्या जगभरात एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गुगल, मायक्रोसॉफ्ट, ओपन एआयसह अन्य कंपन्या यावर काम करत आहेत. काही मिनिटांतच तुम्हाला यावर माहिती मिळणार आहे, पण याच्या काही नकारात्मक बाजूही आहेत. यामुळे लगेच चुकीची माहिती पसरली जाऊ शकते. व्हॉट्सॲपवर अशा अनेक चुकीच्या गोष्टी व्हायरल होत आहेत. त्यामुळे समाजात तेढ निर्माण होण्याच्या घटना घडत आहेत. आता यावर मेटा कंपनीने खोट्या बातम्या थांबवण्यासाठी Misinformation Combat Alliance (एमसीए)सोबत भागीदारी केली आहे. यासाठी ते व्हॉट्सॲपवर एक माहिती तपासणी हेल्पलाइन सुरू करणार आहेत. डीपफेक आणि एआयवरुन तयार केलेली चुकीची माहिती रोखण्यासाठी हे उपयुक्त ठरू शकणार आहे.

नवीन हेल्पलाइन पुढील महिन्यात सुरू केली जाईल. याचे लॉँचिंग मार्चमध्ये होण्याची शक्यता आहे. यामुळे एआय जनरेटेड मीडियामधून चुकीची माहिती रोखण्यात मदत होईल. यामुळे अनेक लोकांची बदणामी होण्यापासून वाचू शकते. अनेक वेळा सायबर गुन्हेगार काही सेलिब्रिटींचे फोटो वापरतात आणि त्यांचे बनावट व्हिडीओ बनवतात.

**माहिती खरी की खोटी अशी तपासा**

तुम्हाला व्हॉट्सॲपवर जर चुकीची माहिती आली असेल तर तुम्हाला एक हेल्पलाईन नंबर दिला जाईल या नंबरवर संदेश पाठवायचा आहे. यानंतर काही वेळातच ती सिस्टीम आपले काम करेल आणि ती माहिती खरी आहे की खोटी हे तपासेल आणि त्याची माहिती तुमच्या पर्यंत पोहचवेल.

**व्हॉट्सॲपला मिळणार अनेक भाषांचा सपोर्ट**

व्हॉट्सअपवर अनेक भाषांसाठी सपोर्ट उपलब्ध असेल. व्हॉट्सॲप चॅटबॉट अनेक भाषांसाठी सपोर्टसह येईल. इंग्रजीशिवाय इतर तीन प्रादेशिक भाषांचाही सपोर्ट असेल. यावर तुम्ही एआय डीपफेकची तक्रार करू शकाल.

# चौकटीबाहेरचे लिहिणाऱ्या लेखिका गौरी देशपांडे



**निमित्त**

गौरी देशपांडे यांचा जन्म ११ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला. त्या चौकटीबाहेर लिहिणाऱ्या मराठीतील लेखिका म्हणून परिचित होत्या. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन, भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्यप्रकार गौरी देशपांडे यांनी हाताळले. मराठीबरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी अनुवादसुद्धा प्रकाशित झाले.

प्रसिद्ध लेखिका, संशोधक इरावती कर्वे या गौरी देशपांडे यांच्या मातोश्री होत. दिनकर धोंडो उर्फ डी. डी. कर्वे हे त्यांचे वडील. जाई निंबकर या इंग्रजी व मराठीतील लेखिका त्यांच्या थोरल्या भगिनी. प्रसिद्ध समाजसुधारक व स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे हे डी. डी. कर्वे यांचे वडील व गौरी देशपांडे यांचे आजोबा होते. 'समाजस्वास्थ्य' या लैंगिक शिक्षण देणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे गौरी देशपांडे यांचे सख्खे काका.

गौरी देशपांडे यांचे पुण्यातच प्रामुख्याने वास्तव्य राहिले आहे. काही काळ मुंबईत, बर्याचशा परदेशवाऱ्या व विंचुर्णी,मराठी साहित्याला स्त्री लेखिकांची मोठी परंपरा लाभली आहे. ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक यांच्यापासून ते अगदी आजच्या कविता महाजन, मोनिका गजेंद्रगडकर याच्यापर्यंत असंख्य स्त्रियांनी निरनिराळ्या पातळीवरून स्त्री आयुष्याच चित्र वाचकांपुढे उभे केले. या सगळ्या प्रभावळीत गौरी देशपांडे यांनी केलेल्या लिखाणाचे वेगळेपण हे विशेष आहे. त्याआधीच्या बऱ्याचशा साहित्यात स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न किंवा पुरुषी वर्चस्वामुळे निर्माण झालेले प्रश्न चर्चिले गेले होते. गौरी देशपांडे यांची पिढी ही स्वातंत्र्योत्तर पिढी होती.

स्त्रियांपुढचे प्रश्न बदलले होते. संपले नव्हते. स्त्रीने शिक्षणासाठी, नोकरीसाठी घराचा उंबरठा ओलांडण्याची सवय समाजाला झाली होती. गौरी यांची पिढी या प्रश्नांपासून पुढे आली होती. समाजाने स्त्रीकडे 'व्यक्ती' म्हणून बघावे अशा विचारांच्या प्रभावाखाली होती. गौरी देशपांडे यांच्या साहित्याची सविस्तर सूची विद्या बाळ, गीताली वि.म., वंदना भागवत संपादित, मौज प्रकाशन गृह प्रकाशित कथा गौरीची या पुस्तकात वाचावयास मिळते. 'बिटवीन बर्थस' या १९६८ साली प्रकाशित झालेल्या इंग्रजी काव्यसंग्रहाने गौरी देशपांडे यांचा लेखनप्रवास सुरू झाला.

गौरी देशपांडे यांच्या लेखनात तिच्या मुक्त विचारांचे प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसते. त्यांचे लेखन स्त्रीवादी असण्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी होते. वेगवेगळ्या पातळीवरचे प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणाऱ्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो असेच त्यांचे लेखनकर्तृत्व आहे. दिवाळी अंकांमधून त्यांनी लिहिलेल्या काही छोटेखानी लोककथाही लक्षणीय आहेत.अशा या महान लेखिकेचे १ मार्च २००३ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : संकष्ट चतुर्थीनिमित्ताने बुधवारी भाविकांनी चिरनेर महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. या पेशवेकालीन मंदिरात प्राचीन महागणपतीची मूर्ती विराजमान आहे. श्रींचे दर्शन घेण्यासाठी गणेशभक्तांची पहाटेपासूनच सुरुवात झाली होती.**

## आरोग्य प्रहर

### 'या' पाच सवयींमुळे बिघडते तुमचे चयापचय



चयापचय हे आपल्या शरीरामध्ये ऊर्जा निर्माण करण्यासाठी आणि एकूण आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ही एक गुंतागुंतीची जैवरासायनिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये तुम्ही जे अन्न खाता आणि पेय पिता त्याचे ऊर्जेमध्ये रूपांतर होते, पण जीवनशैलीतील विविध घटक आणि सवयी या नाजूक संतुलनामध्ये अडथळे निर्माण करू शकतात, ज्यामुळे तुमची चयापचय प्रक्रिया बिघडू शकते. अलीकडेच, पोषणतज्ज्ञ आणि वजन कमी करण्याचे प्रशिक्षक सिमरन खोसला यांनी पाच सवयींबाबत सांगितले, ज्यामुळे तुमचे चयापचय बिघडू शकते.

**सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे व्हिटॅमिन डीची कमतरता**

मानवी शरीर व्हिटॅमिन डी तयार करण्यासाठी सूर्यप्रकाशावर अवलंबून असते. पुरेसा सूर्यप्रकाश न मिळाल्यास आपल्या शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता होते, ज्यामुळे शरीराची ऊर्जा निर्माण करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.

**झोप पूर्ण न होणे**

चयापचय उत्तम प्रकारे कार्य करण्यासाठी पुरेशी झोप घेणे आवश्यक असते, कारण ते लेप्टिन आणि घेरलीनसारखे हार्मोन्सचे नियंत्रण करते. झोप पूर्ण न होणे आणि शांत झोप न लागणे यामुळे इन्सुलिन आणि कोर्टिसोलसारख्या हार्मोन्सचे असंतुलन निर्माण होते, जे चयापचय क्रियेत अडथळा निर्माण करते आणि लठ्ठपणा आणि मधुमेह होण्याचा धोका वाढवते.

**भरपूर प्रमाणत जंक फूड खाणे**

प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांमध्ये भरपूर साखर, आरोग्यासाठी धोकादायक फॅट्स आणि कृत्रिम पदार्थ असतात जे चयापचय प्रक्रिया बिघडवण्यास कारणीभूत ठरतात. अशा पदार्थांमधील कॅलरीचे पोषण मूल्य कमी असते. कमी असलेल्या कॅलरीजच्या सेवनामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते आणि कालांतराने इन्सुलिन रेझिस्टन्स आणि चयापचय कार्य बिघडू शकते.

**रात्रीच्या वेळी फोन वापरणे**

सतत फोन आणि लॅपटॉप वापरण्याच्या आपल्या सवयीमुळे आपण ब्ल्यू लाईटच्या संपर्कात येतो, जे शरीराच्या नैसर्गिक जैविक चक्रामध्ये अडथळा निर्माण करते. यामुळे आपल्या झोपेवर आणि चयापचय प्रक्रियेवर विपरित परिणाम होतो. त्यामुळे वजन वाढणे आणि चयापचयाचे विकार होऊ शकतात.

**ताण-तणाव**

ताण-तणावामुळे शरीरातील स्ट्रेस हार्मोन्स कोर्टिसोलच्या उत्सर्जनास चालना मिळते. उच्च कॉर्टिसोल पातळीमुळे भूक वाढू शकते, उच्च-कॅलरी पदार्थांची लालसा आणि अतिरिक्त फॅट्स साचणे या सर्व गोष्टी चयापचय संतुलनात व्यत्यय आणतात.

# गालगुंड आजाराने लहान मुले हैराण; पालक त्रस्त

## शहरासह ग्रामीण भागातही प्रादुर्भाव

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातही सध्या गालगुंड आजाराची साथ पसरली आहे. गालगुंडामुळे ताप, खोकला, घसादुखीसारखा त्रास जाणवू लागतो. यामुळे रुग्णालयात उपचारासाठी अशा रुग्णांची संख्यादेखील वाढली आहे.

गालगुंड किंवा गालफुगी हा सर्वसाधारणपणे लहान मुलांमध्ये पॅरामिक्झोव्हायरस या विषाणूमुळे होणारा आजार आहे. या आजाराची वेळीच दखल न घेतल्यास गंभीर परिणामही होऊ शकतात. सध्या लहान मुलांमध्ये या आजाराची साथ पसरली असून काळजी घेण्याचे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे.

या आजारात मुलांच्या लाळग्रंथी सुजतात, त्यामुळे गालांचा काही भाग सुजतो. कधी कधी दोन्ही दोन्ही गाल सुजतात. हा आजार झालेल्या मुलांना अन्न गिळता येत नाही आणि पाणीही पिता येत नाही. यामुळे त्यांच्या पचनसंस्थेवरही परिणाम होतो.

मुलांना जर सर्दी, खोकला असेल तर त्याचे विषाणू हवेतून इतरांच्या शरीरात प्रवेश करून त्यांनाही या आजाराची लागण होण्याची शक्यता असते. हा संसर्गजन्य आजार असल्याने शाळेत जाणाऱ्या लहान मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. त्यामुळे काळजी घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत चेहऱ्यावर सूज आहे, तोपर्यंत बाहेर जाणे टाळावे, असे डॉक्टर सांगतात.

**काय केले पाहिजे?**

गालगुंड हा आजार घशाशी संबंधित असल्याने जास्त पाणी पिणे, मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करणे, एमएचआर अंतर्गत मुलांचे गालफुगी या आजाराचे लसीकरण करणे. यामध्ये पहिली लस बाळ १५ महिन्यांचे असताना, तर दुसरी लस साडेतीन वर्षांचे झाल्यानंतर करणे अनिवार्य असते.

**लसीकरण महत्त्वाचे :**

या आजारास प्रतिबंध करण्यासाठी एमएमआर लसीकरण महत्त्वाचे आहे. एक ते नऊ महिन्यांच्या बाळाला लसीचा पहिला डोस देतात, तसेच १५ महिन्यांचे झाल्यावर दुसरा व साडे चार ते पाच वर्षे वयादरम्यान तिसरा डोस दिला जातो.

**गालगुंड हा व्हायरल आजार असल्याने, त्यावर उपचार करण्यासाठी अँटिबायोटिकचा वापर केला जात नाही. प्रामुख्याने लक्षणांवरून गालफुगीवर उपचार केले जातात. सुजलेल्या ठिकाणी वेदना होत असल्यास बर्फाचे पॅक वापरून शेक घेणे किंवा कोमट पाण्याने गुळण्या केल्यास सूज कमी होण्यास मदत होते.**

**-डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा शल्य चिकित्सक**

## मुरूड-जुनीपेठ रस्त्यावर माती; चालक त्रस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील जुनीपेठ येथील रस्ता सध्या मातीमय झाल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेत. जुनीपेठ येथील काही वाडीत कामे सुरू असल्याने माती डंपरमधून नेत असताना ती माती रस्त्यावर पडत आहेत. यावरुन दुचाकी घसरून चालक जखमी झाले आहेत. त्यामुळे प्रशासनाने रस्त्यावर पडलेली माती लवकरात लवकर साफ करून रस्ता चकचकीत करावे, अशी मागणी वाहन चालक व नागरिक करीत आहेत.

## रेवदंडा-साळाव पुलावरून एकमार्गी वाहतूक सुरू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव पुलाच्या दुरूस्ती कामाने वेग घेतला असून पुलावरून एकमार्गी वाहतूक सुरू असल्याने प्रवाशांना दिलासा मिळत आहे.

रेवदंडा-साळाव पुलाचे दुरूस्ती काम सुरू करण्यात आले असून अवजड वाहतूक वळविण्यात आली होती. यामुळे पर्यटकांच्या बसेस व मुरूडकडे जाणाऱ्या मालवाहतूक ट्रकला त्रासदायक ठरत होते. त्यामुळे मुरूड तालुक्यातील विविध कॉटेज, रिक्षा, हॉटेल व्यावसायिकांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले.

आता पुलाच्या दुरूस्तीचे काम वेगाने सुरू असून पुलावरून एकमार्गी वाहतूक सुरू असल्याने प्रवासीवर्गास दिलासा मिळत आहे.





### जाहिर नोटीस

मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर. श्री राजकुमार गणेश पांडे, दुकान क्र. 03, स्वर्ण अनंत सी एच स, प्लॉट नं ३४, सेक्टर नं- १७, कोपरखैरणे, नवी मुंबई ४१०२०९ तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहोत.

आमचे नावे, ताबे कब्जातील मौजे- हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड येथे महसुल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ. क्रं | मालमत्ता क्रं | क्षेत्र चौ मी |
|---|---|---|
| १ | ५/१/१ | ४२७० Sq.mt |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडकोने आम्हांस वर नमूद जमीन मिळकतीमध्ये इमारती बांधण्यास त्यांचे पत्र क्र. सिडको/ नैना/पनवेल/हरिग्राम/बीपी-००६५७/सिसि/२०२३/०४१३ दिनांक-०९ऑगस्ट२०२३. द्वारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगररचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. सिडको/ नैना/ पनवेल/ हरिग्राम/बीपी-००६५७/सिसि/२०२३/०४१३ दिनांक-०९ऑगस्ट२०२३. द्वारे कमेन्समेंट सर्टिफिकेट दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही आमच्या प्रकल्पासंबंधीत खालीलप्रमाणे माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशीत करत आहोत.

| | |
|---|---|
| विकासकाचे नाव आणि पत्ता | मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर. श्री राजकुमार गणेश पांडे |
| मालक नाव आणि पत्ता | मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर. श्री राजकुमार गणेश पांडे, दुकान क्र. 03, स्वर्ण अनंत सी एच स, प्लॉट नं ३४, सेक्टर नं- १७, कोपरखैरणे, नवी मुंबई ४१०२०९ |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर. श्री राजकुमार गणेश पांडे , स.क्रम -५/१/१,मौजे- हरिग्राम, ता. पनवेल. |
| विकासनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्रं. आणि दिनांक | सिडको/ नैना/ पनवेल/ हरिग्राम/बीपी-००६५७/सिसि/२०२३/०४१३ दिनांक-०९ऑगस्ट२०२३. |
| कमेन्समेंट सर्टिफिकेट आदेश क्र आणि दिनांक | सिडको/ नैना/ पनवेल/ हरिग्राम/बीपी-००६५७/सिसि/२०२३/०४१३ दिनांक-०९ऑगस्ट२०२३. |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय) | मंजूर एफ.एस.आय – ०.५ , इ डब्लू एस ०.२ |
| एकूण सदनिका आणि त्याचे मंजूर क्षेत्र | 32 सदनिका , स्टील्ट अधिक ४ मजल्याच्या मंजूर क्षेत्र इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे. ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र १०९८.२० चौ. मीटर (बिल्टअप) आहे. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागतपत्राच्या प्राप्ती तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेच पत्ता | मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर. श्री राजकुमार गणेश पांडे, दुकान क्र. 03, स्वर्ण अनंत सी एच स, प्लॉट नं ३४, सेक्टर नं- १७, कोपरखैरणे, नवी मुंबई ४१०२०९ |
| आर्किटेक्ट् नाव | मे.स्वप्नील कल्याणकर आर्किटेक्टस, श्री. स्वप्निल कल्याणकर |
| स्ट्रक्चलर इंजिनीअर नाव | मे.प्राप्ती असोसिएटेस श्री. राम मराठे |

Place : Panvel
Date:10/01/2024

मे. शांती डेव्हलपर्स तर्फे पार्टनर.
श्री राजकुमार गणेश पांडे

### PUBLIC NOTICE

We, M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey., Shop No. 03, Swarna Anant Chs, Plot No 34, Sector No 17, Koparkhirane, Navi Mumbai., hereby give following Public Notice for information.

We, M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey.,are the developers of the below memtion Non-Agriculture Lan at Village - Harigram , Ta.- Panvel ,Dist.- Raigad. It is duly registered in the record of the Grampanchayat Harigram,Its description is as per following tables:

| Sr.No | Property No./Assessment No. | Area in Square Meter |
|---|---|---|
| 1 | 5/1/1 | 4270 Sq.mt |

The competent authority, (C.A.) i.e. The Associated Planner (NAINA) CIDCO has duly granted ted us permission to construct a building in the above mentioned land vide his letter No. CIDCO/ NAINA/Panvel/Harigram/BP-00657/CC/2023/ 0413 Dated 09 Aug 2023 & The Competent Town Planner Nagar Rachana Niyojan Adhikari i.e Associated Planner (NAINA) CIDCO has issued us Commencement Certificate vide his letter No CIDCO/ NAINA/Panvel/Harigram/BP-00657/CC/2023/0413 Dated 09 Aug 2023 Accordingly. We are hereby publishing following description of our contraction project on the above mentioned land for the information of general public.

| | |
|---|---|
| Name and address of the /Developer | M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey., |
| Name and address of the Owner | M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey., Shop No. 03, Swarna Anant Chs, Plot No 34, Sector No 17, Koparkhirane, Navi Mumbai. |
| Name of the Contractor & Description of property | M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey., S.No – 5/1/1 Of Village - Harigram , Ta.- Panvel ,Dist.- Raigad. |
| The Order No & date of Grant of Permission Letter | CIDCO/ NAINA/Panvel/Harigram/BP-00657/CC/2023/ 0413 Dated 09 Aug 2023. |
| The Order No. & date of the Commencement Certificate | CIDCO/ NAINA/Panvel/Harigram/BP-00657/CC/2023/ 0413 Dated 09 Aug 2023. |
| Approved Floor Space Index (FSI) | Approved FSI – 0.5 & EWS-0.2 |
| Total No. Flats and their Total Approved area. | The Permission has been granted to constructed total 32 flats to be constructed in One (1) Plus four (4) Floor Building whose total Construction area is 1098.20 Sq. Mtr (Built-up) |
| Address of the Place where approved Maps & Documents are available for verification. | M/S. Shanti Developers Through Partner Mr. Rajkumar G. Pandey., Shop No. 03, Swarna Anant Chs, Plot No 34, Sector No 17, Koparkhirane, Navi Mumbai. |
| Name of the Architect | M/s. Swapnil Kalyankar Architects. Mr. Swapnil Kalyankar. |
| Name of the Structural Engineer | M/s. Prapti Associates Mr. Ram Marathe |

Place : Panvel
Date:10/01/2024

M/S. Shanti Developers Through
Partner Mr. Rajkumar G. Pandey.


## माणगावमध्ये कविसंमेलन; कवींचाही सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिनी नगरपंचायत माणगाव व कोकण मराठी साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, मुख्याधिकारी संतोष माळी, उप नगराध्यक्ष राजेश मेहता, नगरसेवक कपिल गायकवाड, दिनेश रातवडकर, अजित तार्ले कर, कोमसाप अध्यक्ष अजित शेडगे, तळा अध्यक्ष हेमंत बारटक्के, कार्यकारिणी सदस्य रामजी कदम, माजी अध्यक्ष सायराबानु चौगुले, ज्येष्ठ सदस्य सुरेखा दांडेकर, मंगल मेहता, ज्योती बुटाला, पत्रकार रवींद्र कुवेसकर, ग्रंथपाल नम्रता जाधव, कर्मचारी व साहित्यिक उपस्थित होते.

कवयित्री सायराबानु चौगुले, मंगल मेहता, सुरेखा दांडेकर, पूजा उभारे, संगीता नाचपल्ले, भानुप्रिया मेथा, विभावरी जाधव, संगीता नाचपल्ले, स्मिता पाबरेकर, प्राची झेमसे, अॅड. अनुष्का भावे, स्नेहल परांजपे, डॉ. अजय मोरे, संदेश शिंदे, हेमंत बारटक्के, रामजी कदम, प्रणय इंगळे, बाबाजी धोत्रे, भानुदास पाटील आदींनी बहारदार कविता सादर केल्या. एकूण ३० कवींनी या काव्यसंमेलनात सहभाग घेतला. सर्व सहभागी कवी कवयित्रींना माणगाव नगरपंचायतीच्या वतीने सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखक इतिहासकार रामजी कदम, शिक्षका मधुरा पालांडे व अपूर्वा जंगलात यांनी केले, तर प्रास्ताविक अध्यक्ष अजित शेडगे यांनी केले.



## जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**रायगड :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मार्च २०२४मध्ये होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मार्च रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित आला असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) श्रीकांत गायकवाड यांनी दिली


### पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/DAY-NULM/PMSVaNidhi/४०२३/प्र.क्र.१२५/३४६/२०२४ दिनांक :- २९/०२/२०२४

**-: जाहीर सूचना :-**

पनवेल महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या स्वनिधी से समृध्दी या योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांचे व्यक्तिशः सर्वेक्षण करुन केंद्र शासनाने तयार केलेल्या संकेतस्थळावर सदर सर्वेक्षणाची माहिती भरणेकरीता Agency नेमणे कामी इच्छुकांनी सदरची दरपत्रके दि. ०६/०३/२०२४ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या DAY-NULM (आदय क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, नाटयगृह) विभागाकडे सादर करावीत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

| अनु. क्र. | कामाचा तपशिल | अंदाज पत्रकीय रक्कम | काम पूर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिके अंतर्गत स्वनिधी से समृध्दी कार्यक्रम राबविणेकरीता Agency नेमणे बाबत. | ९,७५,७५०/- | कार्यादेश दिल्यापासुन ६ महिने पर्यंत | रु.९,७५८/- | रु. ५९०/- (GST सह) |

**या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१) तांत्रिकबोलीचा लिफाफा क्र.१ मध्ये तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे, अनुभव व पात्रता समर्थनार्थ कागदपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड इ. कागदपत्र असावे.
२) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्र.०२ मध्ये सादर करण्याचा आहे.
३) या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि. ०६/०३/२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत DAY NULM विभागात उपलब्ध होतील.
४) जाहीर निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.
५) नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वहातुक खर्चासह समाविष्ठ असावेत.

सही/-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र/पमपा/जनसंपर्क/ ३१२४/प्र.क्र.१६४/१६४/२०२४



### अलिबाग नगरपरिषद

अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

सार्वजनिक सुचना

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ साठी ''शहर समन्वयक'' (City Co-ordinator) ची ११ महिन्या करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता खालील प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून दिनांक ०७.०३.२०२४ पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदनाम | जाग | शैक्षणिक पात्रता | अर्ज कोणाकडे करावा | अनुभव | ठोक माधन |
|---|---|---|---|---|---|
| ''शहर समन्वयक'' (City Coordinator) | ०१ | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी १.बी.ई./बी.टेक. (कोणतीही शाखा) २. बी आर्क. ३. बी. प्लॅनिंग ४.बी.एस.सी. (कोणतीही शाखा) | उमेदवारांनी अर्ज अलिबाग नगर परिषद कार्यालय, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडे सादर करावा. | १. स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. २. शहर समन्वयक च्या व्यतिरिक्त (स्वच्छ सर्वेक्षण/घनकचरा व्यवस्थापन/ पर्यावरण विभागात काम करण्याचा अनुभव) | रुपये ४५,०००/- दर माह |

वयोमर्यादा- कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वय म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथील करता येईल.) अपेक्षीत कामाचे स्वरुप, उमेदवारांसाठी सविस्तर सुचना, अटी व शर्ती अलिबाग नगर परिषद कार्यालयामध्ये दिनांक ०७.०३.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद



### उरण नगरपरिषद, उरण

**जाहिर ई- लिलाव सूचना सन २०२३-२४**

मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण, यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार /संस्था यांजकडुन जाहीर ई-लिलाव मागविणेत येत आहे.

**कामाचा विषय**-उरण नगरपरिषद मालकीच्या भुखंडावर बांधणेत आलेल्या फुलमार्केट इमारतीतील गाळे ३ वर्ष मुदतीकरिता भाडेपट्याने देणेबाबत.

| मजला | गाळा क्र. | बांधकाम क्षेत्र चौ.मि. कारपेट) | एकुण वार्षिक ना-परतावा अनामत रक्कम | एकुण मासिक भाडे रक्कम | फॉर्म फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| तळ मजला | २ | १३.७५ चौ.मि. | ५३,१८५/- | ४४२८ | ५०००/- | १०,०००/- |
| तळ मजला | ३ | १३.७५ चौ.मि. | ५३,१८५/- | ४४२८/- | ५०००/- | १०,०००/- |
| पहिला मजला | १ | ४८.४० चौ.मि. | १,५७,८३२/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| पहिला मजला | २ | ५३.९० चौ.मि. | १,७५,७६८/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| पहिला मजला | ३ | ५१.७० चौ.मि. | १,६८,५९४/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| पहिला मजला | ४ | ४५.१० चौ.मि. | १,४७,०७२/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |
| दुसरा मजला | १ | ४८.४० चौ.मि. | १,५७,८३२/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| दुसरा मजला | २ | ५३.९० चौ.मि. | १,७५,७६८/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| दुसरा मजला | ३ | ५१.७० चौ.मि. | १,६८,५९४/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| दुसरा मजला | ४ | ४५.१० चौ.मि. | १,४७,०७२/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |
| तिसरा मजला | १ | ४८.४० चौ.मि. | १,५७,८३२/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| तिसरा मजला | २ | ५३.९० चौ.मि. | १,७५,७६८/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| तिसरा मजला | ३ | ५१.७० चौ.मि. | १,६८,५९४/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| तिसरा मजला | ४ | ४५.१० चौ.मि. | १,४७,०७२/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |

**जाहिर ई- लिलाव सादरीकरण तपशिल.**

| अ.क्र | तपशिल | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ई-लिलाव प्रसिध्दी दिनांक | दि.०१/०३/२०२४ | - |
| २ | ई-लिलाव व कागदपत्र अपलोड करणेची मुदत | दि.०१/०३/२०२४ | दि.११/०३/२०२४ |
| ३ | कागदपत्र व फॉर्म फी इसारा रकमेचा बॅकर्स चेक अथवा डिमांड ड्राफ्ट नगरपरिषद कार्यालयात जमा करणेचा दिनांक | दि.०१/०३/२०२४ | दि.११/०३/२०२४ |
| ४ | कागदपत्र तपासणी दिनांक | दि.१२/०३/२०२४ | दि.१२/०३/२०२४ |
| ५ | ऑनलाईन /लाइव्ह ई-लिलाव बोलीचा दिनांक | दि.१३/०३/२०२४ | - |

**सुचना/अटी व शर्ती -**

ई-लिलावात भाग घेणाऱ्यांनी युजरनेम पासवर्ड नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील, तसेच स्वतःचे डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) वापरणे गरजेचे आहे.

१. ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छीत असलेल्या लिलावधारकांना www.eauction.gov.in या संकेत स्थळावर सविस्तर तपशील उपलब्ध आहे.

२. ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी www.eauction.gov.in या संकेत स्थळावर जावून पात्रता मिळवणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची पुर्तता करावी लागेल.तसेच आवश्यक कागदपत्रे, अटी/शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर अपलोड करावे व त्याची प्रत नगरपरिषद कार्यालयात दि. ११/०३ /२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

३. दि. ११/०३/२०२४ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत प्राप्त झालेले दस्ताऐवजांची तपासणी करुन पात्र लिलावदारांना सुचीत करणेत येईल. तसेच पात्र लिलावदारांना कोणतेही कारण न देता ई-लिलाव नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेकडे राखुन ठेवणेत येत आहेत. ई-लिलाव बाबतचा अधिक तपशील नगरपरिषदेचे मिळकत पर्यवेक्षक यांचकडे मिळु शकेल.

४. त्रि-सदस्यीय समितीने ठरवून दिलेले ना-परतावा अनामत रकमेपेक्षा जादा बोलीची ई-लिलाव बोली विचारात घेणेत येईल त्यापेक्षा कमी बोलीची ई-लिलाव बोली विचारात घेणेत येणार नाही.

**५. आवश्यक कागदपत्र -**

१. पॅनकार्ड २. आयकर विवरणपत्र (मागिल ३ वर्षाचे) ३.शॉप अॅक्ट लायसन्स/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र ४. फॉर्म फी व इसारा रकमेचा बँकर्स चेक अथवा डिमांड ड्राप्ट ५.जी.एस.टी प्रमाणपत्र. ६.व्यवसाय बाबत माहितीचा अर्ज इ. सर्व कागदपत्र उपरोक्त संकेत स्थळावर अपलोड करणेत येवुन त्याची एक प्रत विहित मुदतीत नगरपरिषद कर्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे बंधनकारक राहील.

दिनांक : २९/०२/२०२४

सही/-
(समीर जाधव)
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण

## निवडक



### युईएस स्कूलमध्ये मराठी दिवस

**उरण :** युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स अँड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. व्यावसायिक वैमानिक असलेल्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्राप्ती राज ठाकूर, त्यांचे पती राज दिपक ठाकूर, आई-वडिल दिपक भास्कर ठाकूर व योगिता दिपक ठाकूर, युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलींद पाडगावकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, खजिनदार चंद्रकांत ठक्कर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख उपस्थित होते. मराठी दिवसानिमित्त सर्वांसाठी मराठी पुस्तकांचे प्रदर्शन मांडले होते. चित्रांद्वारे व शेती करण्यासाठी लागणाऱ्या बैलगाडीसह विविध वस्तूंद्वारे गावाचा नयनरम्य देखावा सादर केला होता. उपस्थित सर्वांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. दिपक भास्कर ठाकूर यांनी संपूर्ण ठाकूर परिवाराच्या वतीने युईएस संस्थेला २५ हजारांची देणगी दिली.

### फुले महाविद्यालयात मराठी भाषा दिन



**पनवेल :** भाषा ही आपली संस्कृती आहे. भाषेला प्रादेशिक भाषांचे सौंदर्य आहे, पण प्रादेशिक भाषा लुप्त होत चालल्या आहेत. म्हणून प्रादेशिक भाषा संवर्धनाची गरज असल्याचे प्रतिपादन खगोल अभ्यासक, पंचांगकार दा. कृ. सोमण यांनी मराठी भाषा गौरव दिन समारंभात पनवेल येथे केले. महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व कोमसाप नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, कोमसाप अध्यक्ष गणेश कोळी, उपप्राचार्य डॉ. प्रा. राजाराम पाटील, प्रा. नामदेव पवार, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. सोनू लांडे, कोमसापच्या स्मिता गांधी, रामदास गायधने, चित्रलेखा जाधव, सुमंत नलावडे उपस्थित होते. या वेळी प्रेरणा भित्तीपत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### बेलापूरमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन



**नवी मुंबई :** अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबईतील बेलापूर शाखेतर्फे, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्कारामागील विज्ञान कार्यक्रमाचे सादरीकरण बेलापूर सेक्टर १९/२०मधील विद्या उत्कर्ष मंडळाच्या आर्ट, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात करण्यात आले. कार्यक्रमाला ७५ विद्यार्थी उपस्थित होते. नावीन्याचा शोध घेणे हा विज्ञान युगाचा मंत्र आहे. मानव समुहाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आपल्या सर्वांनी विज्ञानाची कास धरली पाहिजे, असा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात अशोक निकम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मराठे, उपप्राचार्य डॉ. संजय गायकवाड, प्रा. वैशाली ढमाळ, अनुष्का जाधव, चांदणी पाटील, संकेत शेळके व शेख, अंनिस कार्यकर्ते महेंद्र राऊत व ज्योती क्षीरसागर उपस्थित होते.

### सट्टा बाजारातून नफा मिळवून देण्याचे आमिष

# चौघांना एक कोटी ४५ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

सट्टा बाजारातून मोठा परतावा देण्याचे आमिष दाखवून वेगवेगळ्या प्रकरणात चार जणांची एक कोटी ४५ लाख २३ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. केवळ दोन दिवसांत या चार गुन्ह्यांची नोंद झाली आहे. फसवणूक झाली ते सर्वच उच्चशिक्षित नागरिक आहेत. या गुन्ह्याबाबत सायबर पोलीस ठाणे तपास करीत आहेत.

खारघर येथे राहणारे नवीन शर्मा यांनी ५ डिसेंबरला फेसबुकवर कूट चलनाबाबत जाहिरात पाहिली होती. या जाहिरातीच्या लिंकवर क्लिक करताच त्यांचा समावेश सी ८ आदित्य इन्व्हेस्टमेंट या व्हॉट्सअ‍ॅप समुहात झाला. या समुहात नेमके काय चालते याचे निरीक्षण त्यांनी २५ जानेवारीपर्यंत केले. त्या वेळी कूट चलनामध्ये पैसे गुंतल्यावर कमी वेळात जास्त परतावा मिळत असल्याचे समुहात चालणाऱ्या चर्चेतून त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी समूह प्रशासकाशी याबाबत चर्चा करून गुंतवणूक करण्याची तयारी दाखवली. त्यानंतर वेळोवेळी केलेल्या सूचनांनुसार खाते उघडणे, पैसे टाकणे असे सुरू केले. त्या खात्यात आलेले पैसे किती हे पाहण्यासाठी एक ॲपसुद्धा डाऊनलोड केले होते. नवीन शर्मा यांनी अशा पद्धतीने २७ जानेवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान एकूण ४५ लाख ३८ हजार रुपये भरले, मात्र त्यांची फसवूक झाली.




अशाचप्रकारे गुरुप्रसाद कुलकणी यांनीही १३ लाख ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली होती. त्यांची फसवूणक झाली.तिसऱ्या घटनेत सेवानिवृत्त अधिकारी असलेले इर्शाद बहादुरशहा फरीदसाहच यांनी १७ ऑक्टोबर २०२३ला फेसबुकवरच गुंतवणूक करा भरघोस परतावा अशा आशयाची जाहिरात पाहिली. त्यावर क्लिक करताच इतर दोघांप्रमाणेच त्यांना एका व्हॉट्सअ‍ॅप समुहात सामिल करण्यात आले. त्यांनी शेअर्स खरेदीसाठी म्हणून ४० लाख ६० हजार १०० रुपये गुंतवले, मात्र आता पैसे गुंतवणार नाही अगोदर परतावा आणि मूळ रक्कम द्या, असे सांगताच सर्वांनी संपर्क बंद केला. चौथ्या घटनेत वायू दलातील निवृत्त झालेले राजेश झा यांचीही अशाच पद्धतीने ४० लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आलेली आहे. या गुन्ह्याबाबत सायबर पोलीस ठाणे तपास करीत आहेत.

## उभ्या असलेल्या वाहनांना ट्रकची धडक

### ट्रकचालकाचा मृत्यू; तीन वाहनांचे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावर टायर फुटल्याने रस्त्यावर उलटलेला टेम्पो क्रेनच्या सहाय्याने बाजूला काढण्याचे काम सुरू असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणारा मालवाहू ट्रक रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर धडकल्याने ट्रकचालक वहिद मकबुल शेख (३०) याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना कळंबोली येथे घडली.

या अपघाताला मृत ट्रकचालक जबाबदार असल्याचे आढळल्याने खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात इतर तीन वाहनांचेही मोठे नुकसान झाले आहे.

टेम्पोचालक केतन घायबर (२४) हा बुधवारी (दि.२८) पहाटे ५.३० वा.च्या सुमारास एक्स्प्रेस वेवर कळंबोली येथे आला असताना त्याच्या टेम्पोचा टायर फुटला. त्यामुळे टेम्पो रस्त्यावर उलटला. पोलिसांनी सकाळी ६.१५ वा.च्या सुमारास अपघातग्रस्त टेम्पो रस्त्याच्या बाजूला काढण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यासाठी वाहतूक पोलिसांनी पुण्याहून मुंबईच्या मुबईच्या दिशने जाणाऱ्या वाहनांना थांबवले होते. याच वेळी वहिद शेख हा मालवाहू ट्रक घेऊन भरधाव वेगाने येत असल्याचे वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला, मात्र त्याने ट्रक न थांबवता रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर जोरदार धडक दिली. त्यामुळे त्याच्या पुढे उभी असलेली दोन वाहने एकमेकांवर धडकली. या अपघातात ट्रकचालक वहिद याचा जागीच मृत्यू झाला.

## सीकेटी मराठी विद्यालयात विज्ञान दिन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमात इ. आठवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक रांगोळ्या काढल्या होत्या. इ. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांची माहिती व वैज्ञानिक प्रयोग सादर केले. वैज्ञानिक रांगोळयाचे उद्घाटन इंग्रजी माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी केले.

या कार्यक्रमास उच्च माध्यमिकचे प्राचार्य प्रशांत मोरे, प्राथमिक मराठीचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिकचे पर्यवेक्षक अजित सोनावणे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार मिलन पाटील यांनी केले.

## विद्याभवन संकुलात मराठी भाषा दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या विद्याभवन शिक्षण संकुलात कवी कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक खेळ व भाषिक साहित्याचे प्रदर्शन भरविले.

विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा गौरव नृत्यातून, समूहगीतातून व वक्तृत्वातून व्यक्त केला. इ.सहावीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माझा शब्दकोश या स्वनिर्मित पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.कार्यक्रमाची सांगता वाचनाचे महत्त्व ग्रंथदिंडी काढून सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत बहिणाबाई, वासुदेव, झाशीची राणी लक्ष्मीबाई तसेच जिजामाता यांच्या वेशभूषा परिधान केल्या, तसेच मराठी खाद्यपदार्थांची ओळख करून दिली.

## पनवेल जुई गावात गुटखा विक्रेत्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा कक्ष २च्या पथकाने तालुक्यातील जुई गावातील मोकळ्या मैदानात दोघांवर कारवाई करून त्यांच्याकडून सुमारे १० हजार रुपये किमतीचा गुटखा हस्तगत केला आहे. या प्रकरणी एकाचा शोध सुरू आहे.

गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मानसिंग पाटील, सुनील गिरी व त्यांच्या पथकाने जुई गावात जाणाऱ्या रस्त्याच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानात आरोपी मनन अन्सारी (वय २०) व राजू उर्फ सेन्तू जमशेद शेख (वय ४४) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे विमल कंपनीच्या पानमसाल्यांच्या पुड्या तसेच इतर कंपन्यांच्या सुगंधी पान मसाल्याच्या पुड्या असा मिळून जवळपास १० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## जासई विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचे शुभचिंतन

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजमधून इ. दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ झाला. शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते सुरेश पाटील तसेच संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, स्कूल कमिटीचे सदस्य नरेश घरत प्रमुख पाहुणे उपस्थित होते.



या वेळी सर्व मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा देण्याचे काम रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक व दि रयत सेवक को.ऑपरेटिव्ह बँक साताराचे माजी व्हाईस चेअरमन नुरा शेख, एन.एन हुद्दार, एस. एम. बाबर यांनी केले तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून इ. नववीचा गुरुकुलमधील विद्यार्थी साहिल घरत यांनी शुभेच्छा दिल्या.

साहिल घरत यास रयत शिक्षण संस्थेचा रायगड विभागीय आदर्श विद्यार्थी म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले उलवे शाखेचे चेअरमन खारकर यांनी साहिल यास रोख बक्षीस देऊन सन्मानित केले. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात उरण तालुक्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते या शाळेचे मुख्याध्यापक अरुण घाग व त्यांना सहकार्य करणारे इतर सर्व सेवकांचा सन्मान पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

## पैशांनी भरलेली पिशवी चोरली

**पनवेल : वार्ताहर**

बँकेतून काढलेली एक लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन घरी निघालेल्या तरुणाच्या हातातील पिशवी भरधाव दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हिसकावून पोबारा केल्याची घटना कळंबोलीत घडली. पोलिसांनी या प्रकरणी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

कळंबोली सेक्टर २मधील एलआयजी वसाहतीत राहणारा ओंकार प्रभाकर चव्हाण (वय २४) याचा रस विक्रीचा व्यवसाय आहे. बँकेतून एक लाख रुपये काढून पायी घरी जात असताना, कळंबोली सेक्टर ३ईमध्ये मागून दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्याच्या हातातील लाख रुपयांची पिशवी हिसकावून पलायन केले. या घटनेनंतर ओंकारने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विज्ञान दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील इ. नववीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन प्रयोग करून तसेच रांगोळ्या काढून साजरा केला.

मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमामध्ये चंदा माळी हिने विज्ञान दिनाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. शिक्षिका विशाखा गावंड यांनी सी. व्ही. रामन यांचे कार्य विशद केले. गुरुकुल प्रमुख व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रयोगातून वैज्ञानिक तत्वे कशी शोधावी यासाठी काही प्रयोग स्वतः करून दाखविण्यास सांगितले.

वैभवी सोमासे हिने आपल्या भाषणातून डॉ. सी. व्ही रामण या भौतिक शास्त्रज्ञांनी प्रकाशाचे विखुरणे यासंदर्भात लावलेल्या रमण परिणामाबाबत त्यांना नोबेल पारितोषिकाने सन्मानित केले गेले आणि म्हणून २८ फेब्रुवारी हा नोबेल इफेक्ट या संशोधनाबद्दल राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करण्यात येतो हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



## रसायनीत बालसंगम कार्यक्रम

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

शिक्षण आयामांतर्गत बालसंगम हा बालसंस्कार केंद्रांमधील निवडक मुलांच्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम आपटा फाट्याजवळील द्वारकाधिश मंदिर परिसरात झाला. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रसायनी, उरण व कर्जत तालुक्यांमधून १३६ मुले व १९ संस्कार केंद्रशिक्षिका उपस्थित होते.

मुलांचे पाच गट केले. भगवान बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, नाग्या बाबा कातकरी, राघोजी भांगरे, माता शबरी, द्वारकाधिश मंदिराचे संस्थापक श्री व सौ. कारखानीस यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर मुलांचे बैठे खेळ झाले. यानंतर मंदिरातील प्रसादाचे अतिशय सुग्रास जेवण झाले. इ. चौथी ते सहावीच्या मुलांना भेटवस्तू म्हणून लेखन व चित्रकला साहित्याचे किट देण्यात आले. इ. तिसरीच्या मुलांसाठी हस्तकलेचा वर्ग झाला. समारोप कार्यक्रमात सर्व देणगीदार, कार्यकर्ते, शिक्षिका व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी कोकण प्रांत ज्योती जपे, गौरी साठे, ज्योती पाटील, सुनंदा वाघमारे, रवींद्र पाटील, ज्योती पाटील, लतिका दातार, स्मिता भंडारे, नीला तुळपुळे, संदीप शिंदे, यमुना बुरसे, सुचेता जोशी, जयश्री वाघमारे, वसुधा सहस्त्रबुद्धे, राजश्री कुलकर्णी, बीना रेगे, सुषमा जोशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## नायजेरिया पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन



**खारघर :** डॉ राजेश कापसे लिखित नायजेरिया पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच मंगळवारी (दि. २७) आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल याठिकाणी झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणुन रवींद्र गोळे हे उपस्थित होते.

नायजेरिया देशातील जीवनमान, खान पान, त्याठिकाणची निसर्ग संपदा आदींसह नायजेरिया देशात वैद्यकीय सेवा दिलेल्या डॉ. राजेश कापसे यांनी या पुस्तकांचे सुंदर असे अनुभव मांडले आहेत. या पुस्तकाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याने दुसरी आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. विवेकचे संपादक रवींद्र गोळे, रोटरी क्लब पनवेल सिटीचे अध्यक्ष दीपक जांभेकर, महाराष्ट्र आ.वि.वि. च्या सिनेट सदस्य डॉ. प्रज्ञा कापसे, श्रीनिवास सावंत, सायली क्रियेशन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. राजेश कापसे यांचे आगामी पुस्तक राजूभाई बि. ए. एम. एस. बद्दलही श्रोत्यांना माहिती देण्यात आली.

## धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया अंतर पोहून केले पार

### कोपरखैरणेच्या तन्मय सुतारची दमदार कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

रामशेठ ठाकूर विद्यालय, पेठ येथे वाणिज्य विभागात शेवटच्या वर्षात शिकत असलेला नवी मुंबई कोपरखैरणे गावचा तन्मय सुतार याने गुरुवारी (दि.२९) धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया हे सागरी अंतर अवघ्या नऊ तास ३६ मिनिटांत पोहून पार केले. त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



तन्मय सुतारने यापूर्वी एका महिन्यात पाच सागरी खाड्या पोहून जाण्याचा विक्रमाची नोंद स्वतःच्या नावावर केली आहे. नवी मुंबई भूषण, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड (ग्रँडमास्टर) असे अनेक रेकॉर्ड्स आपल्या नावावर तन्मयने केले आहेत. त्यामुळे तन्मयसह कोपरखैरणे, नवी मुंबईचे नावदेखील देशभरात गाजते आहे. तन्मय हा साहसी जलतरणपटू म्हणून नावारूपास येत आहे. त्याच्या या यशात त्याचे आई-वडील रेखा सुतार, महेंद्र सुतार यांचे योगदान असल्याचे तन्मयने सांगितले, तसेच त्याचे एनएमएसएने सर्व सुखसुविधा सराव करण्यासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. राणे, विजय पाटील व कोच संकेत सावंत, सागरी कोच संतोष पाटील, सूर्यवंशी, फिटनेस कोच जमील यांचेदेखील आभार त्याने व्यक्त केले.

तन्मयने गुरुवारी (दि.२९) पहाटे २.३० वा. धरमतरच्या खाडीत रात्रीच्या अंधारात सूर मारत आपल्या लक्ष्याकडे आगेकूच केली. जवळपास नऊ तास ३६ मिनिटे न थांबता पोहून तन्मय सकाळी ११ वाजून २६ मिनिटांनी गेट वे ऑफ इंडिया पोहचला. त्या ठिकाणी त्याचे जंगी स्वागत करण्यात आले.

# सरकारी कार्यालयांत जनहिताच्या कामाला प्राधान्य द्या

## सुधागड तालुका समन्वय समितीच्या बैठकीत सभेत सूचना

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीची तिसरी सभा (दि.२८) बुधवारी पाली तहसील कार्यालयात झाली. या वेळी समितीचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी, महिला सक्षमीकरण व रोजगार निर्मितीच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यात सरकारी अधिकारी सपशेल अपयशी ठरले असल्याची खंत व्यक्त केली.

सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी, सर्वसामान्य जनतेचे विविध प्रश्न आणि समस्यांचे निराकरण व्हावे, याकरिता सामान्य जनता आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधून प्रशासनावर पकड ठेऊन शासन योजनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी समन्वय समिती कार्यरत असल्याचे अनुपम कुलकर्णी यांनी म्हटले. सुधागड तालुका समन्वय समितीच्या बैठकीत अकार्यक्षम अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. जनहिताच्या कामाला प्रथम प्राधान्य द्या असे आवाहन सरकारी अधिकाऱ्यांना करण्यात आले. या वेळी तहसीलदार उत्तम कुंभार, पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, पं.स. गटविकास अधिकारी लता मोहिते, नायब तहसीलदार भारत फुलपगारे, ज्ञानेश्वर अडसुळे, समितीचे सदस्य संजय म्हात्रे, उज्ज्वला देसाई,ॲड अमोल कांबळे, मंगेश पालांडे, अरविंद फणसे, संदीप दपके, गणेश शिंदे आदींसह विविध शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



दरम्यान, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी तीनही बैठकीला गैरहजर असल्याने सुधागड तालुक्यातील जनतेला बँकेशी निगडित कशा पद्धतीने सेवा मिळत असतील, जनतेच्या बँकेशी निगडित तक्रारींचे काय? याबाबत नाराजी व्यक्त केली. गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांची तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे करण्याबाबत समन्वय समिती अध्यक्ष कुलकर्णी यांनी सुचविले. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार निर्मितीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यावर भर देण्याबाबत चर्चा अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी केली.तालुक्यातील विविध औद्योगिक प्रकल्प, कंपन्यांकडून उपलब्द होणारा सीएसआर फंड स्थानिक गावे, खेड्या पाड्यांना योग्यरीतीने वितरित होतो का? याची चौकशी होऊन योग्य कार्यवाही करण्याची मागणी या वेळी करण्यात आली. पाली नगरपंचायतीच्या बाबतीत आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विविध विकासकामांसाठीचा निधी जलदतेने वितरित व्हावा यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना या वेळी देण्यात आल्या. पालीतील कचरा, डम्पिंग ग्राउंड, सांडपाणी निचरा, स्वछता राखण्याबाबत नगर पंचायतीने उपाययोजना कराव्यात. पाली अंबा नदीवर कोट्यवधींचा निधी खर्चून बांधण्यात आलेला पूल महापुरात वाहतुकीस उपयुक्त ठरत नाही. यावर उपाययोजना करण्याबाबत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. मार्ग रुंदीकरण प्रक्रियेदरम्यान तोडण्यात आलेली वृक्ष अद्याप लावण्यात आलेली नाहीत, ती झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावावीत, अशा सूचना दिल्यानंतर लवकरच झाडे लावण्यात येईल, असे एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी आश्वासित केले.

दुर्गम डोंगराळ भागातून शाळेत, महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून आवश्यक वेळेत ज्यादा एसटी फेऱ्या वाढविण्याच्या सूचना एसटी व्यवस्थापकांना या बैठकीत देण्यात आल्या. कृषी विभागाच्या वतीने शेतकरी मेळावे आयोजित करून शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिल्याबद्दल या बैठकीत कृषी अधिकाऱ्यांचे कौतुक करण्यात आले.

## ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात -ॲड. सुनीता जोशी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे व समाजाला सुधारण्याचे काम करतात, असे प्रतिपादन ॲड. सुनीता जोशी यांनी केले. अलिबाग सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय येथे ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

या वेळी मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग डॉ. हेमंत पवार, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोदार्डे, उपाध्यक्ष शैला पाटील, वणगे, रायगड जिल्हा ग्रंथालय सदस्य नागेश कुलकर्णी, रमेश धनावडे आदी उपस्थित होते.

ॲड. जोशी म्हणाल्या की, ग्रंथ हे गुरु, मित्र, मार्गदर्शक अशा अनेक भूमिका बजावत असतात. स्वतःला अद्यावत ठेवणे, स्पर्धेत टिकून रहाणे यासाठी वाचनाला पर्याय नाही. वाचनामुळे विचारात प्रगल्भता येते. नवे विचार मांडून समाजाला दिशा देणे हे ग्रंथाचे काम आहे. मोठ्यांची चरित्र आपल्याला प्रेरणा देतात. वाचनातून व्यापक जीवनदर्शन होत राहते. सर्वकष वाचन हे आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करते. आपल्या ज्ञानाचा आवाका विस्तारते, तर संतसाहित्य निरामय आनंदाचा मार्ग दाखवते असेही त्या म्हणाल्या. प्रस्ताविक व आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी व्यक्त केले.



## खोपोलीत बेलदार समाज वधू-वर परिचय मेळावा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय बेलदार वधू-वर परिचय मेळाव्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नांदेड, औरंगाबाद, अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, नाशिक, धुळे, ठाणे, मुंबई, पालघर, रत्नागिरी, रायगड येथील समाज बांधवांनी उपस्थिती लावली होती . या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणामध्ये आई-वडील आपल्या मुली/मुलगा यांना सोबत घेऊन आले होते. त्यामुळे या कार्यक्रमाचा जो मूळ उद्देश आहे तो सार्थकी लागताना दिसला. कार्यक्रमाला रायगड, पुणे येथील ज्येष्ठ मंडळी ज्यांनी आपल्या आयुष्यातील बरीच वर्ष समाजसेवेसाठी घालवली अशांनी उपस्थित राहून सर्व मुला मुलींना आशीर्वाद दिले व मार्गदर्शन केले.



मेळाव्याचे खोपोली खालापूर येथील समाज बांधवांनी अतिशय उत्तम पद्धतीने आयोजन केले होते. कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून माजी नगराध्यक्ष व मराठा समाज नेते डॉ सुनील पाटील , हरीश काळे, दिनकर भुजबळ हे उपस्थित होते. तसेच बेलदार समाजाचे माजी संस्थापक अध्यक्ष शंकरराव साळुंखे ,राजूभाऊ साळुंखे, भगवंत चव्हाण ,गुलाबराव मोहिते, विजय जाधव आदी उपस्थित होते. खोपोलीतील स्थानिक ग्रामस्थ पुंडलिक साळुंखे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. कोहिनूर चव्हाण व त्यांचे सहकारी हे या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक होते.साधना साळुंके,अंकुश पवार यानी कार्यक्रमाचे समालोचक केले. या कार्यक्रमासाठी शंभर वधूवरांनी उपस्थिती नोंदवली व स्वतःची ओळख करून दिली.हा कार्यक्रम बेलदार समाजाला नवीन ओळख करून देणारा ठरला.

## कुसुमाग्रज जयंती आणि मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा अपर्णा ओक यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाला संस्थेचे सचिव अशोक काते ,खजिनदार सुनिल उमरोटकर,वसंतराव नाईक कॉलेजचे ग्रंथपाल प्रा.माशलेसर,रेखा धारिया ग्रंथपाल उदय करडे,सायली चोगले, प्राची मेंदाडकर,न्यू इंग्लिश स्कूलचे कामडीसर,वसावेसर,आमलेसर आणि न्यू इंग्लीश स्कूलचे विध्यर्थी मोठया संखेने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.रायप्पा माशाले यांनी भाषेत संवाद साधताना शब्दांची देवाण घेवाण झाल्याने भाषेची निर्मिती होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.शब्द संवाद साधताना बोलायला लागतो तेव्हा ज्या भाषेत बोलतो तेव्हा कंठातून विशिष्ट प्रकारचा आवाज ऐकू येतो तेव्हा काही मराठी शब्दांचा उच्चार करतांना तोंडातील वेगवेगळया अवयवांचा वापर कसा होतो आणि वाक्य शुद्ध होते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.मराठी भाषा ही विखुरली गेली आहे.मराठी भाषेत सर्वच कवींचे, साहित्यिकांचे योगदान आहे त्यात कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे मराठी भाषे बद्दलचे प्रेम आणि त्यांनी मराठी भाषेचा केलेला सखोल अभ्यास,मराठी भाषा साहित्य गोळा करून समृद्ध कशी केली याची माहिती दिली. कुसुमाग्रजांना मुळातच आकाश चांदणे, तारे, तारकांचे वेड होते त्यामुळे अवकाश मंडळातील एका ताऱ्याला त्यांचे नाव देण्यात आले.स्वीडनमधील इंटरनॅशनल स्टार रजिस्ट्री मार्फत दि.२७ फेब्रुवारी १९९६ रोजी स्वर्गदारातील तारा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तार्याला कुसुमाग्रजांचे नाव देण्यात आल्याची माहिती उपस्थितांना यावेळी माशाळे यानी दिली.

वाचनालयाचे संचालक सुनिल उमरोटकर यांनी मनोगत व्यक्त करताना आपला भारत देश हा विविधतेने नटलेला आहे.

आपल्या देशातील प्रत्येक राज्यात जाऊ तिथे भाषा बदलत असते असे असले तरी मराठी भाषेत किती गोडवाआहे या बाबत समाधान व्यक्त केले.संचालक रेखा धारिया यांनी एखादी संस्कृती परंपरा टिकवायची असेल तर आपली मातृभाषा टिकवायला पाहिजे असे रेखा धरिया यांनी मनोगतात सांगितले. उपस्थितांचे आभार उपाध्यक्षा अपर्णा ओक यांनी मांनले.

## चौक परिसरात उन्हाळी भात लावणी अंतिम टप्प्यात

**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरात शेतकऱ्यांनी उन्हाळी भातशेती केली आहे. सद्यस्थितीत भातलावणी अंतिम टप्प्यात आली असून काही ठिकाणी पूर्ण झाली आहे.

खालापूर तालुक्यात कलोते, डोणवत, भिलवले येथे सिंचन प्रकल्प आहेत, पण डोणवत वगळता कुठल्याच धरणाच्या पाण्यावर उन्हाळी भातशेती केली जात नाही. पाताळगंगा नदी आणि इतर धरणाच्या उपनद्यांवर भाजीपाला पिकविण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आहे. सध्या भातलावणीची कामे अंतिम टप्प्यात आली असून शेत मजुर मिळणे कठीण काम झाले असून आलेला मजूर देखील जास्त मजुरीबरोबर इतर खानपान करताना शेती व्यवसाय करणे कठीण झाल्याची भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. सद्या शेतकरी याचेच कुटुंब शेती पासून दूर जाताना दिसत आहे, नवीन पिढीला शेती व्यवसायात रस नाही, असेच चित्र आहे. अनेक शेतकरी यांनी आपली शेती विकल्याचे विदारक चित्र दिसत आहे. खतांची झालेली भरमसाठ वाढ, शेती करण्यास होणारा खर्च,बियाणे महाग झाली, मजुर मिळणे कठीण, मजुर मिळाल्यास त्याची मजुरी आणि खानपान परवडत नाही.

त्यामुळे भविष्यात शेती करणे टिकेल असे वाटत नाही. न परवडणारी शेती पुन्हा एकदा समूह अथवा एकत्र शेती केल्यास शेतकऱ्याला, बळीराजाला दिलासा मिळेल असे वाटते.

## रेवस येथे मोफत आरोग्य शिबिर

**अलिबाग** : लायन्स क्लब अलिबाग मांडवा, लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग, रेवस ते पाली पदयात्रा मंडळ रेवस गाव तसेच समता फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने रेवस कोळीवाडा येथे मोफत नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन ३ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान करण्यात आले आहे. डोळ्यावर मांस वाढणे अथवा वेले येणे, अश्रुग्रंथी, तिरळेपणा अशा नेत्रविकारांवर या वेळी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येईल. नागरिकांनी शिबिरास येताना रेशन कार्ड, आधार कार्ड आणावे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक १) नरेश कमळाकर पाटील, २) जगदीश कमळाकर पाटील, ३) अनिता भाऊ मोकल, ४) सुलोचना कमळाकर भोईर, ५) पदमा जनार्दन भोईर, ६) अमर जनार्दन भोईर, ७) प्रतीक जनार्दन भोईर, ८) अनंता बाळाराम चौधरी, ९) अरूण बाळाराम चौधरी, १०) सुरेश बाळाराम चौधरी, ११) मंजूळा वसंत ठाकूर, १२) पार्वती शंकर पाटील, १३) यमूना बाळाराम चौधरी, १४) मिना संतोष भगत, १५) संतोष चंद्रकांत पाटील, १६) प्रेमनाथ चंद्रकांत पाटील सर्व रा. मु. चिंचवण, पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे-चिंचवण, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६० | ० | ०-७०-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-७०-०० | १०.९४ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठदी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : २९/०२/२०२४

सही/-
**निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट
मो नं ८१०८५५८२८९

पत्ता : शॉप नं १३०, मुन्सिपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६


## निवडक



### मुरुडमध्ये मराठी भाषा गौरव दिन

**मुरुड** : अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील ग्रंथालय व सांस्कृतिक समितीच्या वतीने वक्तृत्व, निबंध लेखन, कविता लेखन आणि मराठी वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धांमध्ये जवळजवळ ४० विद्यार्थी उत्सपूर्तपणे सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे, प्रा. तमसील शाहजहान, हुमेरा घारे, फातिमा सुर्वे, आयेशा देशमुख, इकरा दरोगे, अरफा कलबसकर आदींनी परिश्रम घेतले.

### ‘हिरवळ’तर्फे मराठी भाषा दिन साजरा



**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाडमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व आणि सखोलता या विषयावर माहिती सांगितली. संचालिका सोनाली धारिया, मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनीही आपले विचार व्यक्त केले. महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक सहाय्यक प्रा. ज्योती पुजारी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

### कशेणे शाळेचे बालमेळाव्यात यश



**माणगाव** : तालुक्यातील विघवली केंद्राने मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून विघवली केंद्रातील शाळांसाठी बालमेळावा आयोजित केला होता. या बालमेळाव्यात राजिप कशेणे शाळेने उज्ज्वल यश संपादन केले. पारंपरिक लोकनृत्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा यांचे आयोजन केले होते. यामध्ये केंद्रातील १३ शाळा सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक लोकनृत्य स्पर्धेमध्ये कशेणेच्या जोगवा या नृत्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला, तसेच वक्तृत्व स्पर्धेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर शाळेतील इ. चौथीतील आर्या विशाल शिर्के हिने मांडलेल्या विचारांना प्रथम क्रमांक प्राप्त झाला. निबंध स्पर्धेमध्ये श्रेयश गणेश मुंडे इ. तिसरी या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका अपूर्वा जंगम व सहशिक्षिका दिप्ती ढेपे यांनी मार्गदर्शन केले.

### मजगाव शाळेला कपाट भेट



**मुरूड** : राजिप शाळा मजगाव येथे माजी विद्यार्थी मच्छिंद्र मानाजी यांनी शाळेची प्रशासकीय कामाची गरज लक्षात घेऊन कार्यालयीन कपाट भेट दिले. शाळा ही व्यक्तीच्या विकासाला आकार देते. या शाळेच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माजी विद्यार्थी मच्छिंद्र मानाजी यांच्याकडे कार्यालयीन कपाटाचा प्रस्ताव ठेवल्यानंतर तात्काळ शाळेस कपाट भेट दिले, असे शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत गोयजी यांनी सांगितले. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती मजगांवचे अध्यक्ष निखील मानाजी, शिक्षक चेतन चव्हाण, मनिषा भोईर, हर्षा नांदगावकर, रंजिता केमकर, प्रमिला फुंदे आदी उपस्थित होते.

### कोलाड महाविद्यालयात मराठी भाषा दिन

**रोहे** : तालुक्यातील कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. या वेळी प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, उपप्राचार्य नेहल प्रधान, कार्यालयीन अधीक्षक अमोल गोलीपकर, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. सतीश सावळे व प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. विश्वनाथ देशमुख यांनी मराठी भाषेच्या इतिहासावर प्रकाश टाकला. डॉ. सतीश सावळे यांनी, मराठी भाषा वाचली पाहिजे. आजपर्यंत मराठी साहित्यातील तीन साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले असून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सरकार ही वेगवेगळी धोरणे राबवीत आहे असे सांगितले. कार्यक्रमास विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. रेश्मा शेळके, हिंदी विभागाचे प्रमुख सूर्यकांत आमलपुरे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. प्रतीक्षा पडवळ, क्रीडा प्रमुख प्रा. दर्शना माळी, विज्ञान विभागातील प्रा. कीर्ती राधाकृष्णन, प्रा. गीतू मोहन, प्रा.म्हसकर मॅडम, प्रा. बामुगडे मॅडम, पाटील मॅडम, प्रा. मोरे मॅडम आदी उपस्थित होते.

